पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १८९ ■ गुरूवार, दि. १५ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# लोकशाहीच्या उत्सवाला उत्साहात प्रारंभ !

- ऑन द स्पॉट रिपोर्ट
- मतदानाला शांततेत सुरूवात, चौका-चौकात मतदार सहाय्यता बुथ,
- वयोवृद्ध, आजारी व्यक्तींसाठी ऑटोंची व्यवस्था
- सर्वच उमेदवारांच्या कार्यकर्त्यांची धावपळ

प्रतिनिधी १५ जानेवारी

**अकोला** :सर्वात मोठ्या लोकशाहीच्या उत्सवाला आजच्या रम्य सकाळपासून मतदारांच्या उत्साहात प्रारंभ झाला. त्यात थंडीचा जोरही काहीसा कमी असल्याने सकाळपासूनच मतदानासाठी मतदान केंद्रांवर रांगा लागलेल्या दिसून आला. जागोजागी मतदारांना आपले मतदान केंद्र पाहण्यासाठी बुथ लावण्यात आले होते. तसेच आपापल्या परिसरातील वयोवृद्ध व आजारी मतदारांना केंद्रापर्यंत ने-आण करण्यासाठी ऑटोची सुविधाही उपलब्ध करून देण्यासाठी सर्वच पक्ष कार्यकर्त्यांची धावपळ सुरू असल्याने आजची सकाळ सर्वार्थाने उत्साहवर्धक अशीच पहावयाला मिळाली. सर्वत्र शांततेत मतदान प्रक्रिया सुरू असल्याचे चित्र सकाळी १०.३० वाजेपर्यंत दिसून आले.

लोकशाहीच्या या उत्सवाला कोणतेही गालबोट लागू नये व आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही, यासाठी पोलिस प्रशासन विभाग व निवडणूक विभाग दक्ष असल्याचे मतदान केंद्रांवर दिसून आले. जिकडे तिकडे पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त व निवडणून विभागाचे काटेकोर नियोजन दिसून आले. मतदानासाठी येणाऱ्यांना आपली वाहने परिसराबाहेरच लावण्याचे निर्देश पोलिस कर्मचारी देत होते. तसेच मतदान केंद्राच्या आजूबाजूला विनाकारण गर्दी होणार नाही, याची दक्षताही ते घेताना दिसून आले. बिनकामाच्या लोकांना मतदान केंद्राच्या परिसराबाहेर उभे राहण्याच्या सूचनाही देण्यात आल्या होत्या. त्यामुळे सर्वच केंद्रावर शांततेत मतदान सुरू होते. दुसरीकडे वरिष्ठ नेते, उमेदवार व त्यांचे कार्यकर्ते एकूण परिस्थितीवर लक्ष ठेवून होते.



## रस्त्यांवर शुकशुकाट तर चौका-चौकात गलबलाट!

◆आजच शहरापुरती शासकीय सुटी जाहीर करण्यात आल्याने शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये बंद होती. तसेच दुकाने, प्रतिष्ठानेही उघडली नसल्याने रस्त्याने फक्त मतदानासाठी जाणाऱ्यांचीच गर्दी दिसत होती. त्यामुळे सर्वत्र शुकशुकाट होता तर चौका-चौकातील मतदार बुथवर आपली नावे पाहण्यासाठी गलबलाट दिसून आला होता. तेथून मतदान केंद्रावर जाण्यासाठी ऑटोची सुविधा असल्याने त्या ठिकाणी गर्दी दिसून आली.

## मतदारांची उडाली धांदल



विधानसभा निवडणुकीसाठी असलेल्या मतदान केंद्रावरच आपले नाव असेल, असे समजून अनेक जण त्या केंद्रावर गेले. मात्र तेथे नाव नसल्याने त्यांची धांदल उडाली होती. अनेक प्रभागात हे चित्र पहावयास मिळाले. अनेक ठिकाणी एकाच कुटुंबातील सदस्यांची नावे वेगवेगळ्या मतदान केंद्रावर असल्याने त्यांना वेळेवर धावपळ करावी लागली. त्यामुळे ते गोंधळ करीत होते. पतीचे मतदान एका केंद्रावर तर पत्नीचे मतदान दुसऱ्या केंद्रावर असल्याचे प्रकारही काही ठिकाणी घडले आहेत. निवडणूक विभागाच्या या यादीतील घोटाळ्यामुळे अनेकांना त्रास सहन करावा लागल्याचे चित्र दिसून आले.

## अकोल्यात १.३० वाजेपर्यंत ३०.४५ टक्के मतदान

अकोला. महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी गुरूवार १५ जानेवारी रोजी मतदानाला सुरूवात झाली. दुपारी १.३० वाजेपर्यंत मतदानाची टक्केवारी ३०.४५ होती.

शहरातील विविध मतदान केंद्रांवर मतदानासाठी उत्साह दिसून आला. विविध वयोगटातील मतदारांनी मतदान केले. काही अपवाद वगळता मतदान शांततेत सुरू होते. पोलिस बंदोबस्त अतिशय चोख होता.

## संवदेनशील मतदान केंद्रावर कडेकोट बंदोबस्त




शहरातील ६४ संवेदनशील केंद्रांवर पोलिसांचा विशेष बंदोबस्त दिसून आला. त्यामुळे सर्वत्र पोलिस कर्मचारी दिसून आले होते. तर इतर केंद्रांवर एक दोन पोलिस कर्मचारी असूनही शांततेत मतदान प्रक्रिया सुरू होती. या व्यतिरिक्त पोलिस प्रशासन व निवडणूक विभागाचे फिरते पथक संवेदनशील व इतर मतदान केंद्रांवर भेटी देऊन परिस्थितीची पाहणी करताना दिसून आले आहेत.


## दुपारनंतर मतदानाला गती

◆सकाळच्या सुमारास महिला वर्गांना कामे असल्याने सकाळी मतदानाची प्रक्रिया हळूहळू सुरू होती. दुपार ही प्रक्रिया गती घेतल्याचे दिसून आले आहे. सकाळी कामावर जाणाऱ्यांनी मतदान करूनच कामावर जाण्याने पसंत केले. असे असले तरी सर्वच केंद्रांवर सकाळपासूनच मतदानाची प्रक्रिया सतत सुरू होती. विशेष म्हणजे मतदानासाठी सर्वच कुटुंबीय एकत्र येत असल्याचे दिसत होते.

## आम्ही मतदान केले आपणही करा!















# मतदार भाजपाची एकाधिकारशाही मोडून काढणार– ॲड. प्रकाश आंबेडकर

प्रतिनिधी १५ जानेवारी

**अकोला** : अकोला महापालिका निवडणुकीसाठी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा एडवोकेट बाळासाहेब आंबेडकर यांनी कृषी नगर परिसरातील २२ नंबर शाळेत सपत्नीक मतदान केले. यावेळी उपस्थित मीडियाशी संवाद साधताना त्यांनी म्हटले की मतदार जागृत झाला असून भाजपाची एकाधिकारशाही मोडण्याची मतदारांनी पूर्ण तयारी केली आहे शहरात कोणत्याही एका पक्षाला बहुमत मिळणार नसून संमिश्र सरकार येणार असल्याची संभावना त्यांनी व्यक्त केली यंदा मतदानाबाबत मतदारांमध्ये जागृती निर्माण झाली असून राज्यात गुंडागर्दी व पैसा वाटप करणाऱ्यांना सुद्धा त्यांनी पिटाळून लावले आहे हे लोकशाही टिकविण्याबाबत चांगले चित्र दिसून असल्याचे त्यांनी सांगितले अकोला शहरातही मतदारांनी साड्या वाटपाचा कार्यक्रम हाणून पाडला तर पैशांची पाकीट सुद्धा परतून लावल्याची त्यांनी सांगितले मुंबई महापालिकेत सुद्धा संमिश्र पक्षांची सत्ता स्थापित होण्याचे सुतोवाच सुद्धा त्यांनी केले.




# उशिरा रात्रीपर्यंत चौका चौकात अफवांचे पेव, कोणाची हवा व कुठे वाटप याचीच चर्चा

प्रतिनिधी १५ जानेवारी

**अकोला** : निवडणुकीच्या आदल्या रात्री सर्व पक्ष आणि उमेदवारांसाठी अत्यंत आव्हानात्मक ठरली. सर्व मतदारसंघांमध्ये रात्री उशिरापर्यंत राजकीय हालचाली शिगेला पोहोचल्या. शहरातील प्रत्येक चौका चौकात तसेच गल्लीबोळात 'इथे पैसे वाटप सुरू आहे, तिथे पैसे वाटप सुरू आहे' अशा चर्चांना पेव फुटले होते. निवडणुकीची हवा कोणत्या दिशेने वाहत आहे आणि मतांचे विभाजन कोणत्या दिशेने होत आहे याबद्दल चर्चा उशिरा रात्रीपर्यंत सुरूच होत्या. सर्वांचे लक्ष आता शुक्रवारच्या सकाळकडे लागले आहे. जेंव्हा लोकशाहीची खरी परिक्षा होईल आणि जनमत ईव्हीएममधून बाहेर येईल.

१४ वा वर्धापन दिन

Akola Life Support Pvt. Ltd. ICON HOSPITAL

आपली आरोग्य सेवा हाच आमचा मानस !

आजवरच्या आमच्या यशस्वी वाटचालीचा भाग असलेल्या सर्व रूग्ण परीवारांचे, सर्व डॉक्टर मित्र व कर्मचारी वर्गांचे तसेच आपण सर्वांचे मनापासुन आभार !

- आपातकालीन आणि गंभीर काळजीसाठी तज्ञ डॉक्टरांची चमू
- व्यावसायिक रित्या पात्र अनुभवी प्रशिक्षीत तंत्रज्ञ
- अनुभवी नर्सिंग स्टाफ, अनुभवी तज्ञ आपातकालीन सेवेसाठी



सर्व विशेष आणि सुपर स्पेशालिटीज, क्रिटीकल आणि टर्शरी केअर मधे सर्व निदान सुविधांसह एकाच छताखाली

24 तासाचा दिवस | 07 दिवस आठवड्यातून | 365 दिवस वर्षातून

प्रत्येक सेकंदाची मोजणी

सदैव आपल्या सेवेत

डॉ. प्रशांत अग्रवाल अध्यक्ष | डॉ. दिपक मोरे उपाध्यक्ष | डॉ. राजेश काटे व्यवस्थापकीय संचालक

आयकॉन हॉस्पिटल

(दि युनिट ऑफ अकोला लाईफ सपोर्ट प्रा.लि.)

केडीया प्लॉट, उमरी रोड, अकोला 9527440055 0724-2411263

# प्रभाग 17 मध्ये एमआयएम व काँग्रेस उमेदवारात जुंपली

◆ पोलिसांनी वेळेतच केला हस्तक्षेप, परिस्थिती नियंत्रणात





प्रतिनिधी १५ जानेवारी

**अकोला** : जुने शहरातील प्रभाग क्रमांक १७ मध्ये मतदान सुरू असताना भांडपुरा चौकातील महापालिकेच्या दहा नंबर शाळेच्या मतदान केंद्रावर काँग्रेस आणि एमआयएमच्या उमेदवारात चांगलीच जुंपल्याचे दिसून आले. दोघेही उमेदवारांच्या समर्थक मोठ्या संख्येने जमा झाले होते. परिस्थिती नियंत्रण आणण्यासाठी उपस्थित पोलिसांनी वेळेवर हस्तक्षेप केल्याने तणाव निवळण्यास मदत झाली.

पोलिसांनी मतदान केंद्रावर जमा झालेल्या कार्यकर्त्यांना पिठाळून लावले घटनेची माहिती मिळतात जिल्हा पोलीस अधीक्षक घटनास्थळी दाखल झाले होते घटनेबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की या दोन उमेदवारांमध्ये थोडी शाब्दिक बाचाबाची झाली परंतु पोलिसांनी वेळेत हस्तक्षेप केल्याने परिस्थिती नियंत्रणात आली सध्या मतदान शांततेत सुरू असून सर्वांनी मतदान करीत आपला मतदानाचा हक्क बजावत मतदानाचा टक्का वाढवावा असे आवाहनही त्यांनी केले



सिटी न्यूज अमरावती

गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ | http://epaper.citynewssuperfast.com

## तृतीयपंथीयांना तक्रार नोंदविण्यासाठी हेल्पलाईन

**अमरावती:** तृतीयपंथीयांना तक्रार नोंदविण्यासाठी हेल्पलाईन सुरू करण्यात आली. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. केंद्र शासनाने ट्रान्सजेंडर व्यक्ती हक्काचे संरक्षण कायदा २०१९ व नियम २०२० संपूर्ण देशात लागू झाला आहे. त्याअनुषंगाने तृतीयपंथीय समाजातील व्यक्तींसाठी केंद्र शासनातर्फे स्वतंत्र पोर्टल तयार करण्यात आले आहे. या पोर्टलवर तृतीयपंथीयांसाठी १४४२७ हा राष्ट्रीय हेल्पलाईन क्रमांक जाहिर करण्यात आला आहे. या हेल्पलाईन क्रमांकाद्वारे तृतीयपंथीय व्यक्तींना योजनांची माहिती, अर्ज प्रक्रिया संबंधित मार्गदर्शन, अडचणीचे निराकरण, तसेच तक्रारी नोंदविण्यासाठी केंद्र शासनाची तृतीयपंथीय हेल्पलाईन सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.


गरजूंनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याणच्या प्रादेशिक उपायुक्त माया केदार, सहायक आयुक्त राजेंद्र जाधवर यांनी केले आहे.

# निवडणूक रणधुमाळीत पैशांची उधळण ; आचारसंहितेला धक्का

### ◆ महादेव खोरीत रोकड जप्त

प्रतिनिधी | १५ जानेवारी

**अमरावती :** महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात आचारसंहिता लागू असताना महादेव खोरी परिसरात मोठी कारवाई करण्यात आली. एका संशयास्पद वाहनातून २ लाख ५९ हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली असून, या घटनेमुळे शहरात चर्चेला उधाण आले आहे.



निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस विभागाकडून शहरात कडेकोट नाकाबंदी सुरू आहे. याच दरम्यान महादेव खोरी परिसरात एमएच २७ डीयु ५६६७ क्रमांकाचे वाहन संशयास्पदरीत्या फिरत असल्याची माहिती नागरिकांनी निवडणूक विभागाला दिली. माहिती मिळताच महानगरपालिकेचे क्षेत्र क्र. ३ चे निवडणूक निर्णय अधिकारी नितीन बोबडे तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

सदर परिसर फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असल्याने ठाणेदार रोशन शिरसाट यांनी आपल्या पथकासह घटनास्थळी धाव घेतली. वाहनाची तपासणी करण्यात आली असता त्यातून २ लाख ५९ हजार रुपयांची रोकड आढळून आली. तपासणीपूर्वीच वाहनातील चार संशयित इसम पोलिसांना पाहून पसार झाले, त्यामुळे संशय अधिक गडद झाला आहे.

विशेष म्हणजे संबंधित वाहनावर वकिलाचा बोधचिन्ह (लोगो) असल्याने या प्रकरणाला वेगळे वळण मिळाले आहे. जप्त करण्यात आलेली रक्कम कोणाची आहे, ती कुणासाठी आणि कशासाठी नेली जात होती, याबाबत निवडणूक प्रशासन व पोलीस विभागाकडून तपास सुरू आहे.

या घटनेमुळे महानगरपालिका निवडणुकीच्या काळात होणाऱ्या गैरप्रकारांबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली असून, प्रशासनाकडून पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# वोटिंगदरम्यान ईव्हीएम ठप्प; अनेक प्रभागांत मतदारांचा खोळंबा, निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह

### ◆ तांत्रिक बिघाडामुळे मतदान रखडले; मतदारांमध्ये नाराजी, प्रशासनाकडून दुरुस्तीचे प्रयत्न

प्रतिनिधी | १५ जानेवारी

**अमरावती :** महापालिका निवडणुकीच्या मतदानादरम्यान शहरातील अनेक प्रभागांमध्ये ईव्हीएम (इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र) अचानक बंद पडल्याच्या घटना समोर आल्या. मतदानाच्या गर्दीच्या वेळीच यंत्रणा ठप्प झाल्याने मतदारांना तासन्तास मतदान केंद्रांवर थांबावे लागले. परिणामी मतदान प्रक्रियेत मोठा खोळंबा निर्माण झाला.

काही मतदान केंद्रांवर ईव्हीएम सुरू न होणे, तर काही ठिकाणी मतदान केल्यानंतर पावती न मिळण्याच्या तक्रारी मतदारांनी केल्या. यामुळे मतदारांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले. अनेक ठिकाणी ज्येष्ठ नागरिक, महिला व दिव्यांग मतदारांना याचा मोठा त्रास सहन करावा लागला.



घटनेची माहिती मिळताच निवडणूक प्रशासनाने तांत्रिक पथके पाठवून यंत्रणा दुरुस्तीचे प्रयत्न सुरू केले. काही केंद्रांवर राखीव ईव्हीएम उपलब्ध करून मतदान पुन्हा सुरू करण्यात आले. मात्र, या विलंबाचा थेट परिणाम मतदानाच्या टक्केवारीवर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, विरोधी पक्षांनी या प्रकारावर तीव्र नाराजी व्यक्त करत निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ईव्हीएम बिघाडाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणीही करण्यात येत आहे.

निवडणूक आयोगाकडून मात्र सर्व तांत्रिक अडचणी तात्काळ दूर करण्यात आल्याचा दावा करण्यात आला असून मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडल्याचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

# सिकलसेल मुक्त' साठी 'अरुणोदय' मोहिम

### ◆ आरोग्य विभागाचे जिल्हास्तरीय प्रशिक्षण

प्रतिनिधी | १५ जानेवारी

**अमरावती :** सिकलसेल आजाराचे प्रमाण कमी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे 'अरुणोदय' ही विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या पूर्वतयारीसाठी आज येथील आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्रात जिल्ह्यातील आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांचे विशेष प्रशिक्षण शिबिर पार पडले.

ही मोहीम संपूर्ण जिल्ह्यात १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत प्रभावीपणे राबविली जाणार आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाला श्रीमती डॉ. पोटपिटे, डॉ. शिरसाठ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. हर्षल क्षीरसागर, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी वनिता शिंदे, जिल्हा सिकलसेल समन्वयक गोकुळ ठाकूर उपस्थित होते. उपस्थितांनी मोहिमेचे नियोजन, सिकलसेलचे लवकर निदान, उपचार आणि जनजागृती या विषयावर मार्गदर्शन केले.

ही मोहीम राज्यातील २१ जिल्ह्यांमध्ये राबवली जात आहे. त्यानुसार जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाची तपासणी करण्याचे उद्दिष्ट आहे. सिकलसेल हा अनुवांशिक आजार असून लाल पेशी विळ्याच्या आकाराच्या झाल्यामुळे रक्तपुरवठ्यामध्ये अडथळा येतो, त्यामुळे विवाहापूर्वी 'सोल्युबिलिटी टेस्ट' करणे आवश्यक आहे. लाल आणि पिवळे कार्ड असलेल्या व्यक्तींनी आपापसात विवाह टाळावा, असा सल्ला देण्यात आला आहे.

सिकलसेलग्रस्त रुग्णांना शासनामार्फत विविध सवलती दिल्या जातात. यात संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्य, दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेत जादा वेळ, एसटी बस प्रवासात सवलत दिली जाते. जिल्ह्यातील नागरिकांनी शासकीय आरोग्य केंद्रात जाऊन सिकलसेलची मोफत तपासणी करून या मोहिमेला सहकार्य करावे असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले यांनी केले आहे.

# राष्ट्रीय युवा दिनानिमित्त 'संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा' चे आयोजन

प्रतिनिधी | १५ जानेवारी

**अमरावती:** जानेवारी च्या राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधानाबाबत जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने 'संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा २०२५ -२६' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या राज्यस्तरीय उपक्रमाच्या माध्यमातून युवकांमध्ये संविधानातील मूल्ये, मूलभूत अधिकार व कर्तव्यांची जाणीव निर्माण करण्यावर भर देण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत सहभागी विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन स्वरूपात १५ दिवसांचे प्रशिक्षण राबविण्यात येणार असून, या प्रशिक्षणात संविधानासंबंधी सखोल माहिती व मार्गदर्शन दिले जाणार आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी १० जानेवारी २०२६ पर्यंत इच्छुक विद्यार्थ्यांनी नोंदणी करण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी केले आहे.

हा राज्यस्तरीय उपक्रम महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती व जमाती आयोग यांच्या वतीने राबविण्यात येत असून, भारतीय संविधानातील मूल्ये, मूलभूत अधिकार व कर्तव्यांची जाणीव युवकांमध्ये निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. युवकांनी संविधान समजून घेऊन जबाबदार, सजग आणि लोकशाही मूल्यांवर आधारित नागरिक म्हणून घडावे, यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. ठघर घर संविधानठ या संकल्पनेतून ही जनजागृती चळवळ राज्यातील प्रत्येक घरापर्यंत व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. ही प्रश्नमंजुषा राज्यातील इयत्ता ८ वी ते पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी खुली असून, संपूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येणार आहे. १२ जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून ऑनलाईन प्रशिक्षणास प्रारंभ होईल. प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, नागपूर येथील तज्ज्ञ प्राध्यापक मार्गदर्शन करणार असून आवश्यक अध्ययन साहित्य ऑनलाईन उपलब्ध करून दिले जाणार आहे. ही स्पर्धा मराठी, हिंदी व इंग्रजी या तीन भाषांमध्ये आयोजित करण्यात येणार आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर ऑनलाईन पद्धतीने (प्रॉक्टरिंगसह) परीक्षा घेण्यात येईल. सहभागासाठी केवळ ९९ रुपये इतके नाममात्र शुल्क आकारण्यात येणार आहे.

या स्पर्धेमध्ये यशस्वी ठरणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आकर्षक पारितोषिकांची घोषणा करण्यात आली असून प्रथम पुरस्कार १ लाख रुपये, द्वितीय पुरस्कार ५१ हजार रुपये, तृतीय पुरस्कार ११ हजार रुपये यासोबतच सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना रोख पारितोषिकांसह प्रमाणपत्रे देण्यात येणार असून, सहभागी सर्व विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या वतीने सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल. हा उपक्रम आदिवासी विकास विभाग, अल्पसंख्यांक विकास विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, नागपूर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (बार्टी), पुणे तसेच युवा करिअर क्लब यांच्या संयुक्त सहकार्याने राबविण्यात येत आहे.

# पी. आर. पोटे पाटील आयुर्वेद हॉस्पिटल मध्ये स्त्री रोग निदान उपचार शिबिर संपन्न

प्रतिनिधी | १५ जानेवारी

**अमरावती :** पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ मेडिकल सायन्सेस आयुर्वेद अमरावती येथे मोफत, भव्य स्त्रीरोग निदान उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला सर्वसाधारण रोगनिदान तपासणी, व गर्भाशय मुख तपासणी पॅप स्मिअर, कॅन्सर, पाळीतील अनियमितता, स्तन व योनीचे विकार वंध्यत्व तपासणी व उपचार रक्ताचे प्रमाण , साखरेची प्रमाण आदि आजारांची तपासणी व औषधोउपचार करण्यात आला या शिबिरात ११० रुग्णांनी लाभ घेतला. या शिबिराचे उद्घाटन म्हणून पी आर पोटे पाटील आयुर्वेद रुग्णालय चे प्रभारी प्राचार्य डॉ. भार्गव टप्पे सर यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच डॉ, शरयू गायकवाड यांनी स्त्रीयांच्या कर्करोगा विषयी मार्गदर्शन केले व रुग्णांची तपासणी करून त्यांना उपचार करण्यात आले तसेच रुग्णाची तपासणी व उपचार करण्यासाठी डॉ.दिपाली नवले, डॉ. अश्विनी खार्डे डॉ . मनिषा भगत यांनी तज्ञ चिकित्सक म्हणून आपली सेवा दिली. या शिबिराचे सूत्रसंचालन कोमल पडोळे यांनी केले. आणि आभार प्रदर्शन डॉ. हेमलता माहोरे यांनी केले.

# जिल्ह्यातील ८० शाळांमध्ये राबविणार 'शाळा सुरक्षा कार्यक्रम'

### ◆ ३०० आपदा मित्र व सखी देणार आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

प्रतिनिधी | १५ जानेवारी

**अमरावती:** जिल्ह्यातील नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींचा धोका लक्षात घेता, आपत्ती व्यवस्थापनाबाबत जनजागृती करण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून विशेष पाऊल उचलण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्रशिक्षित करण्यात आलेले ३०० आपदा मित्र आणि आपदा सखी आता जिल्ह्यातील पूरप्रवण व धोकादायक भागातील ८० शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे थेट प्रशिक्षण देणार आहेत, अशी माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली. जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सक्षम करण्यासाठी ३०० आपदा मित्र व सखींची निवड करून त्यांना १२ दिवसांचे निवासी प्रशिक्षण देण्यात आले आहे. या प्रशिक्षित स्वयंसेवकांना शाळा सुरक्षा कार्यक्रम प्रभावीपणे राबविता यावा, यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात नुकतेच एक दिवसीय उजळणी प्रशिक्षणही देण्यात आले. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना पूर, भूकंप, आग आणि वीज पडणे यांसारख्या संकटांच्या वेळी 'काय करावे आणि काय करू नये' याचे मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच प्रथमोपचार, शोध व बचाव साहित्याची ओळख, जखमींना उचलण्याच्या विविध पद्धती आणि आपत्ती काळातील शासनाची भूमिका या विषयावर प्रात्यक्षिकांसह जनजागृती केली जाणार आहे.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविला जात आहे. मान्सून कालावधीत आणि इतर आपत्तींमध्ये हे आपदा मित्र प्रशासनाला मोलाची मदत करत आहेत. या शालेय प्रशिक्षणामुळे ग्रामीण भागातही या स्वयंसेवकांची ओळख निर्माण होणार असून, आपत्तीच्या वेळी होणारी जीवितहानी टाळण्यासाठी मोठे मनुष्यबळ उपलब्ध झाले आहे. या कार्यक्रमाला जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी आणि जिल्हा शोध व बचाव पथक उपस्थित राहणार आहे. विशेष म्हणजे, कोणतेही मानधन न घेता हे आपदा मित्र समुदाय समन्वयक म्हणून सामाजिक बांधिलकीतून कार्य करत आहेत, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी दिली आहे.

# खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापनांनी ई-आर-१ सादर करण्यासाठी ऑनलाईन सुविधांचा लाभ घ्यावा

प्रतिनिधी | १५ जानेवारी

**अमरावती :** कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय यांच्याकडून पुरविण्यात येणाऱ्या रोजगारविषयक सर्व सेवा आता ऑनलाईन करण्यात आलेल्या आहेत. या सुविधांसाठी www.mahaswayamed.goved.in हे संकेतस्थळ विकसित करण्यात आले आहे. तसेच उद्योजक व आस्थापना यांनी सेवायोजन कार्यालय (रिक्त पदे अधिसूचित करण्याची सक्ती करणारे) कायदा १९५९ व नियमावली १९६० कलम ५(१) व कलम ५ (२) अन्वये त्रैमासिक ई-आर-१ ऑनलाईन सादर करणे बंधनकारक आहे.

डिसेंबर-२०२५ अखेर संपणाऱ्या त्रैमासिक ई-आर-१ ऑनलाईन या प्रपत्राची माहिती वरील संकेतस्थळावर सर्व शासकीय, निमशासकीय, खाजगी उद्योजक, आस्थापना यांनी त्यांचे युजर आयडी व पासवर्डच्या माध्यामातून लॉगिन करून ऑनलाईन सादर करावयाची आहे. ऑनलाईन ई-आर-१ सादर करतांना काही अडचण असल्यास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, या कार्यालयाशी संपर्क साधावा. किंवा दुरध्वनी क्रमांक ०७२१-२५६६०६६ यावर संपर्क साधावा.

## सिटी न्यूज सुपरफास्ट | खामगाव

# युगधर्म पब्लिक स्कूलमध्ये राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती साजरी



प्रतिनिधी | १५ जानेवारी

**खामगाव :** युगधर्म पब्लिक स्कूलमध्ये राजमाता जिजाऊ मासाहेब आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे अध्यक्ष गोपाल अग्रवाल सर आणि शाळेचे मुख्याध्यापक मा. अनिरुद्ध विचारसर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाली. यावेळी राजमाता जिजाऊ मासाहेब तसेच स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. रेखा राऊत मॅडम यांनी केले. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षकवृंद व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राजमाता जिजाऊ मासाहेब यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकताना सौ. संगीता देशमुख मॅडम यांनी प्रेरणादायी भाषण केले. त्यांनी जिजाऊंच्या संस्कारक्षम नेतृत्वाची व छत्रपती शिवाजी महाराजांच्या घडणीत असलेल्या त्यांच्या मोलाच्या योगदानाची माहिती दिली. तसेच स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर विशाल राठोड सर यांनी विचार मांडत युवकांसाठी त्यांच्या विचारांचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाचा समारोप कुमार कांचन लोखंडे मॅडम यांच्या आभार प्रदर्शनाने करण्यात आला सदर कार्यक्रमातून आदर्श जीवनमूल्ये, राष्ट्रभक्ती आणि संस्कारांचे महत्त्व पटवून देण्यात आले.

# खामगावात मकर संक्रांतीच्या दिवशी दिवसभर पतंगबाजी

प्रतिनिधी | १५ जानेवारी

**खामगाव :** नवीन वर्षाच्या १४ जानेवारीला मकर संक्रांतीचा सण साजरा केला जातो. या दिवसापासून सूर्य उत्तरायणाकडे जाऊ लागतो आणि या सणापासूनच शुभ कार्ये सुरू होतात. अशा स्थितीत शुभकार्याची सुरुवात साजरी करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पतंगबाजी केली जाते. आगमनाचा आनंदोत्सव साजरा करण्यासाठी पतंग उडविण्याची परंपरा सुरू आहे. त्यामुळे लहान मुले, तरुण, मुली, महिला, पुरुष पतंगबाजीचा आनंद घेण्यासाठी मकर संक्रांतीची वाट पाहत असतात.

यावर्षी खामगाव शहरात मकर संक्रातीनिमित्त बुधवारी मोठ्या प्रमाणावर पतंगबाजी करण्यात आली. प्रशासनाच्या काटेकोरपणाला न जुमानता नायलॉन मांजा खुलेआम श वापर करण्यात आला. गुजरातसह संपूर्ण देशात संक्रांतीचा सण मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. या दिवशी दान आणि स्नानाला विशेष महत्त्व आहे तसेच पतंग उडवण्यालाही विशेष महत्त्व आहे. मकर संक्रांतीला पतंग उत्सव म्हणूनही ओळखले जाते. देशातील अनेक राज्यांमध्ये या दिवशी पतंग उडवण्याची विशेष परंपरा आहे. दुसरीकडे रंगीबेरंगी पतंगही सजलेले दिसत आहेत. पतंग उडवण्याची क्रिया आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. उन्हात वेळ घालवल्याने हिवाळ्यात त्वचेच्या समस्यांपासून आराम मिळतो. लाल, हिरवे, निळे, पिवळे इत्यादी रंगीबेरंगी पतंग आकाशात फडफडतात तेव्हा असे वाटते की या पतंगांच्या सहाय्याने आपली स्वप्नेही वास्तवाच्या शिखराला भिडत आहेत आणि आपण सगळे आपापली वैरभाव विसरून एकमेकांच्या पतंगात भांडतो.





सिटी न्यूज अकोला

गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## नायलॉन मांजामुळे एकजण जखमी

**तेल्हारा :** नायलॉन मांजामुळे मनब्दा येथील ग्राम पंचायत रोजगार सेवक जखमी थोड्याने जीव वाचला. मानेवरचा वार हातावर घेतला. येथील खासगी रुग्णालयात त्यांनी वेळेत उपचार घेतले. मांजामुळे जखमी होण्याच्या घटना घडत आहेत. प्रशासनाने नायलॉन मांजाचा वापर करू नये असे आवाहन करण्यात आले होते परंतु तरीही प्रतिबंधित मांजाची विक्री मोठ्या प्रमाणात झाली.



## वीर गाथा प्रोजेक्ट ५.० मध्ये अकोल्याच्या विधी वानखडेचा राष्ट्रीय डंका

प्रतिनिधी १५ जानेवारी



**अकोला :** भारत सरकारच्या MyGov उपक्रमांतर्गत तसेच संरक्षण मंत्रालय आणि शिक्षण मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या वीर गाथा प्रोजेक्ट ५.० या राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित स्पर्धेत अकोल्याच्या श्रीमती राधादेवी गोयनका विद्यामंदीर हायस्कूल येथील विद्यार्थिनी कु. विधी प्रदीप वानखडे हिने देशभरात आपली गुणवत्ता सिद्ध करत मानाचा राष्ट्रीय गौरव पटकावला आहे. या स्पर्धेत देश-विदेशातून तब्बल १.९२ कोटी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. विशेष म्हणजे १८ देशांतील CBSE संलग्न शाळांमधील विद्यार्थ्यांचाही यात समावेश होता. इतक्या प्रचंड स्पर्धात्मक वातावरणात कु. विधी वानखडे हिची Meritorious Students – Super 100 या राष्ट्रीय गुणवंत यादीत निवड झाली असून अकोल्याच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी हा अभिमानास्पद क्षण ठरला आहे.

# जागेच्या वादावरून महिलेस आठ ते दहा महिला व पुरूषांनी केली मारहाण

प्रतिनिधी १५ जानेवारी

◆ महिलेस मारहाण करणाऱ्यांना ग्रामपंचायत सदस्यांची फूस

**अकोला:** जिल्ह्यातील डाबकी जहागीर गावातील प्रतिमा मनोहर पळसपगार ही महिला आपल्या आईसोबत गावच्या जिल्हा परिषद शाळेच्या मागे असलेल्या जागेत मागील वीस ते पंचवीस वर्षापासून रहात आहे ही जागा नावावर करून देण्यासाठी महिलेने जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज सुद्धा सादर केला आहे. महिलेचे घराचे अतिक्रमण काढण्यासाठी ग्रामपंचायत डाबकी जहागीर येथील अधिकाऱ्यांनी अडथळा आणण्याचा प्रयत्न केल्यामुळे महिलेने दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला होता सदर प्रकरणी न्यायालयाने ग्रामपंचायत व अधिकाऱ्यांविरुद्ध मनाई हुकुम सुद्धा पारित केला असून त्या उपरही या महिलेला विनाकारण त्रास देण्याचा प्रयत्न सुरू आहे



सदर जागेवर तात्यांची आवार भिंत बांधण्यासाठी मोजणी करत असताना सौ प्रतिमा पळसपगार या महिलेला आठ ते दहा लोकांनी मज्जाव करीत मारहाण केली त्यातील काही पुरुषांनी महिलेचा हात धरून तिला मेन रोड पर्यंत ओढत आणले आवार भिंत बांधल्यास तुला जीवाने मारून टाकू तसेच घर जाळून टाकण्याची त्यांनी धमकी दिली महिलेने मारहाणीचा हा प्रकार आपल्या मोबाईल मध्ये घेण्याचा प्रयत्न केला असा एका महिलेने मोबाईल फेकून दिला व महिलेला तुला जे करायचे असेल ते करून घे अशी धमकी सुद्धा दिली मारहाण करणारे सर्व गावातीलच नागरिक असून त्यामध्ये निशा राठोड, अशोक राठोड, तेजल जाधव, गणेश तायडे, आकाश राठोड, व अन्य तीन ते चार अनोळखी इसमांचा समावेश होता. अनुसूचित जातीच्या महिलेस मारहाण करणाऱ्या या सर्वांना गावचे सरपंच व अन्य ग्रामपंचायत सदस्यांचा पाठिंबा असल्याचा महिलेने आरोप केला असून जीव घेणा हल्ला करणारे विरोधात पोलीस स्टेशन पिंजर येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे परंतु पोलिसांनी तक्रार केल्यानंतर सुद्धा आरोपींवर कारवाई न झाल्याने महिलेने जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे तक्रार केली आहे या सर्व आरोपीविरुद्ध कडक कारवाई करण्यात यावी व महिलेच्या जीवाला संरक्षण मिळावे अशी मागणी या महिलेने केली असून या महिलेच्या घरामागे तायडे नामक एका व्यक्तीचा अवैध दारूचा धंदा असून या ठिकाणी नेहमी दारुड्यांची गर्दी पहावयास मिळते तसेच शाळेच्या भिंतीमागे नेहमीच पत्ते खेळणारे दिसून येतात या सर्वांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी या महिलेने केली आहे.

## हिवरखेड मध्ये तरुणांनी केला पतंग उत्सव साजरा

प्रतिनिधी १५ जानेवारी

**हिवरखेड:** येथे तरुणांनीच नव्हे तर काही तरुणींनी सुद्धा पतंग उत्सव साजरा केला. मकर संक्रांतीच्या दिवशी तरुणाई पतंग उडी उडी जाय तालावर थिरकली. मात्र चायनिज मांजा कुठेच आढळून आला नाही, एवढे नक्की सर्व तरुणांनी पोलिसांचे नियम पाळले असून मानवाला मानवा जवळून कुठलीच हानी होईल असे कृत्य कुठेच कोणी या दिवशी केले नाही. स्थानिक पातळीवर वेगळेपण दिसून आले.



## अकोट सिल्वर फाउंडेशनतर्फे नगराध्यक्ष, विद्यार्थिनी व सदस्यांचा सन्मान



प्रतिनिधी १५ जानेवारी

**अकोट :** सिल्वर फाउंडेशनची वार्षिक सभा १० जानेवारी रोजी श्री शिवाजी विद्यालयात पार पडली. सभेचे अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष प्रभाकर पांडे तर प्रमुख अतिथी अकोट नगरपालिका नवनिर्वाचित अध्यक्ष माया विवेक धुळे, राजूभाऊ नागमते, माजी जिप सदस्य गोपाल कोल्हे यांच्यासह उपाध्यक्ष मेहुल नगदिया, रवींद्र कापसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मायाताई धुळे यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. डॉ. विवेक धुळे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्रास्ताविका नंतर विजय भोरे यांनी वार्षिक हिशोब सादर केला. यावर्षी सिल्वर फाउंडेशन सोबत २५ नवीन सदस्य जुळले. महिला मंडळ अध्यक्षपदी उज्वला भिसे यांची नियुक्ती करण्यात आली. मायाताई धुळे यांनी सिल्वर फाउंडेशनच्या कार्याची दखल घेत सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. राजूभाऊ नागमते, गोपाल कोल्हे यांनी सिल्वर फाउंडेशनच्या कार्याचा आढावा घेतला. मान्यवराच्या हस्ते पत्रकार रामदास काळे, नितीन तेलगोटे, निलेश नवघरे व नुकतीच सीए झालेली रिटा मंगवानी यांचा शाल, श्रीफळ सन्मानचिन्ह सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन प्रकाश गायकी यांनी केले.

## सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये स्वामी विवेकानंद व जिजामाता यांचा जन्मोत्सव उत्साहात साजरा


प्रतिनिधी १५ जानेवारी



**अकोट:** आकोट तांदूळवाडी फाटा स्थित सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये १२ रोजी स्वामी विवेकानंद व जिजामाता यांचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया, लुनकरण डागा, प्रमोद चांडक, दीपक लखोटीया, शारदा लखोटिया ,रेखा चांडक, मु.द्वारिका प्रसाद बसेर, कविता मिश्रा तसेच जिजामातेच्या भूमिकेमध्ये रेणुका सुरपाटणे तर स्वामी विवेकानंद च्या भूमिकेत निकुंज भगत मंचावर उपस्थित होते.

सर्वप्रथम स्वामी विवेकानंद व जिजामातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. वर्ग तिसरी ते आठवीच्या विद्यार्थी रेणुका सुरपाटणे, निकुंज भगत, ईश्वरी लावडे, मधुरा भगत ,विशाखा कुटे यांनी स्वामी विवेकानंद व जिजामाता यांच्या बद्दल मनोगत व्यक्त केले. उमेश कुलट यांनी स्वामी विवेकानंदाचे अलौकिक व्यक्तिमत्व व राजमाता जिजाऊ यांनी शिवाजी महाराजांवर केलेल्या संस्काराची जाणीव मुलांना करून दिली. शाळेच्या कविता मिश्रा यांनी मा जिजाऊ स्वामी विवेकानंद यांच्या बद्दल बोलताना सांगितले 'उठा जागे व्हा व ध्येय प्राप्तीपर्यंत थांबू नका' तर तुम्ही समाज बदलवण्यासाठी योगदान करू शकाल असे मुलांना सांगितले. द्वारिका प्रसाद बसेर यांनी माता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन रुची काळे यांनी केले.

## व्याळा येथे राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांची ५७ वी पुण्यतिथी सोहळाचे आयोजन



**व्याळा :** येथील श्री गुरुदेव सेवा मंडळ व समस्त गावकरी मंडळ, व्याळा यांच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा ५७ वा पुण्यतिथी सोहळा दिनांक १९ जानेवारी २०२६, सोमवार रोजी संत तुकाराम महाराज चौक, व्याळा येथे भक्तिभावपूर्ण वातावरणात संपन्न होणार आहे.

या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त दिवसभर विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून सायंकाळी ६.०० ते ६.३० या वेळेत सामुदायिक प्रार्थना, त्यानंतर ६.३० ते ७.३० या वेळेत भजन संमेलन आयोजित करण्यात आले आहे. रात्री ७.३० ते ८.०० दरम्यान पूजन व स्वागत समारंभ पार पडणार असून या कार्यक्रमासाठी मुंबई उच्च न्यायालयाचे अॅड. वल्लभ नारे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी अनंत राऊत (व्याळा) करणार आहेत. या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे तरुणांच्या हृदयाची तोफ म्हणून ओळखले जाणारे, ह.भ.प. प्रा. डॉ. प्रशांत महाराज ठाकरे यांचे रात्री ८.०० ते १०.०० या वेळेत होणारे हरिकीर्तन.

## श्री छत्रपती शिवबा प्रतिष्ठानच्यातर्फे पत्रकार दिन साजरा

प्रतिनिधी १५ जानेवारी



**अकोट:** येथील छत्रपती शिवबा बहुउद्देशीय सेवा शिक्षण संस्थेच्या वतीने पत्रकार दिन साजरा करण्यात आला. अॅड. संतोष खवले व पत्रकारांच्या हस्ते दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सहकार नेते हिदायत पटेल यांना सामूहिक श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष पुरुषोत्तम इंगोले, पत्रकार पवन बेलसरे, अहेमद शेख, गणेश वाकोडे, संतोष विनके, नरेंद्र कोंडे, प्रकाश गायकी, प्रियंका केदार, नितीन तेलगोटे, धनु बायवार, युवा प्रतिष्ठानचे वैभव जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती. पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून त्यांच्या कार्याचा गौरव करणे आपले कर्तव्य आहे असे खवले यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वंश दांदळे, श्रीविष देशमुख, उमेश गारोळे, गौरव धांडे, अविनाश नाटेकर, अमृता खवले, स्नेहा झास्कर, सागर वाघमारे, महेश वाघमारे, गणेश नारे, महेश वाघमारे, महेश वाघ, साजिद शेख पवन मोरे, प्रफुल्ल मते यांनी अथक परिश्रम घेतले कार्यक्रमाचे संचालन प्रा. प्रवीण बोंद्रे तर प्रास्ताविक संम्यक संस्थेचे निखिल वानखडे तर आभार वंश दांदळे यांनी व्यक्त केले.

## ग्रामपंचायतीच्या 'सांडपाणी' नियोजनामुळे आरोग्य धोक्यात

प्रतिनिधी १५ जानेवारी

**आलेगाव:** आलेगावमध्ये स्वच्छतेचे धिंडवडे काढले जात आहेत. मुख्य रस्त्यावर सांडपाणी सोडण्याच्या ग्रामपंचायतीच्या मनमानी निर्णयामुळे केवळ अपघातच होत नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या आणि सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. सर्व जाती-धर्माची शिकवण असलेल्या 'स्वच्छते'च्या संस्कृतीलाच या प्रशासनाने हरताळ फासला आहे.

**विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात; 'देशाचे भविष्य' चिखलात**

या मुख्य रस्त्यावर विविध शासकीय कार्यालये, नामांकित शाळा आणि महाविद्यालये आहेत. दररोज हजारो विद्यार्थी याच मार्गावरून आपल्या उज्वल भविष्याकडे पाऊल टाकतात. मात्र, गेल्या ४-५ वर्षांपासून या विद्यार्थ्यांना गुडघाभर साचलेल्या घाणेरड्या पाण्यातून शाळा गाठावी लागत आहे. 'आजची तरुण पिढी हेच भारताचे भविष्य आहे, पण जर हेच भविष्य अशा अस्वच्छतेमुळे आजारी पडले किंवा अपघाताला बळी पडले, तर देशाची प्रगती कशी होईल?' असा संतप्त सवाल पालक विचारत आहेत.



**सर्वधर्मीयांच्या भावना दुखावल्या**

आलेगावमध्ये सर्व जाती-धर्माचे लोक गुण्यागोविंदाने राहतात. प्रत्येकाला आपापल्या प्रार्थनास्थळी, मंदिरात किंवा मशिदीत जाण्यासाठी याच मुख्य रस्त्याचा वापर करावा लागतो. भक्ती आणि श्रद्धेच्या ठिकाणी जाताना अशा घाणेरड्या आणि दुर्गंधीयुक्त पाण्यातून जावे लागल्याने नागरिकांच्या धार्मिक भावनांनाही ठेच पोहचत आहे. प्रशासनाने पैसे लाटण्याच्या नादात गावातील ही सामाजिक आणि सांस्कृतिक स्वच्छता पूर्णपणे ढासळून टाकली आहे.

प्रशासकीय आदेशांना 'केराची टोपली'

विशेष म्हणजे, जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) यांनी यापूर्वीच सांडपाणी नियोजनाचे कडक आदेश दिले आहेत.

आकाश आवटे याला या अपघातात गंभीर दुखापत झाली असून त्याच्या डाव्या पायाला फ्रॅक्चर झाले आहे. या घटनेनंतर पोलिसांनी आणि सरपंचांनी केवळ 'तोंडी आश्वासन' देऊन रस्ता मोकळा केला असला तरी, जोपर्यंत सांडपाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटत नाही आणि रस्त्यावरील घाण काढली जात नाही, तोपर्यंत ग्रामस्थ स्वस्थ बसणार नाहीत. या भ्रष्ट कारभाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरत आहे.

## पवनपाल महाराज प्रबोधनपर कीर्तनाला ग्रामस्थांचा प्रचंड प्रतिसाद

प्रतिनिधी १५ जानेवारी

**अकोट :** अकोट अकोट तालुक्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेल्या उमरा गावात गुरुवारी (दि. ८) सप्तखंजिरी वादक सत्यपाल महाराज आमचे शिष्य ह.भ.प. पवनपाल महाराज (वडाळीकर) यांच्या प्रबोधनपर बहारदार कीर्तनातून विविध उदाहरणे सामाजिक दृष्ट्या विविध दाखले देत उदाहरणे देत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारानुसार गावाचा नक्शा बदलण्याकरता योग्य व्यक्ती हा कसा असू शकतो तर ते रामदादा मंगळे यांच्या सारखा असू शकतो असे आपल्या वाणी मधून त्यांनी उद्गार काढले





कारण आजपर्यंत त्यांनी ग्राम विकासासाठी तसेच गावात विविध उपक्रम ठेवत चांगल्या दिशेला गती देण्याचा प्रयत्न केला विशेषता उमरा गावासाठी दोन रुग्णवाहिका मोफत सेवा म्हणून उपलब्ध करून दिल्या शेतकऱ्यांसाठी पंजाब डक यांचा कार्यक्रम माहितीसाठी शेतकऱ्यांना हवामानाचा अभ्यास व्हावा त्याचबरोबर रक्तदान शिबिरे सह विविध शिबिराचे उपक्रम सुद्धा राबवले आहेत, नदीकाठच्या अनेक गावातील नागरिकांना आर्थिक निधी सुद्धा उपलब्ध करून दिला गेल्या काही महिन्यात इंदुरीकर महाराज यांचे भव्य समाज प्रबोधन करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन केले होते विशेष बेलुरा गावाचे ते चार वेळा सरपंच राहिले असून क्षेत्रातून निधी खेचून आणणे व गाव विकासाला प्राधान्य देणे हेच ध्येय ठेवत त्यांनी आज सुद्धा पवनपाल महाराज वडाळीकर यांच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते कार्यक्रम भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला. सर्वप्रथम संत गजानन महाराज यांच्या फोटो प्रतिमेचे पूजन करून सामाजिक कार्यकर्ते राम मंगळे यांच्या पुढाकाराने वतीने मीनानाथ मंदिर प्राणांगणा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बेलुरा गावचे माजी सरपंच रामदादा मंगळे होते, तर उद्घाटन जयश्री दीदी यांच्या हस्ते झाले. व्यासपीठावर सपना दीदी, बेलुरा गावच्या सरपंच दीपिका मंगळे, ज्ञानेश्वर मानकर, दिनकर उकळकार, वसंता ताडे, पवन मिश्रा, रामेश्वर कावरे, विठ्ठल लोणकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी रामदादा मंगळे यांनी उमरा सर्कलमधील विविध विकासकामांची माहिती दिली. त्यानंतर पवनपाल महाराज यांनी समाजप्रबोधनपर विचार मांडत कीर्तन सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रवीण बोंद्रे यांनी केले, या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजक रामदादा मित्रपरिवार, पवन कुमार मिश्रा, रामेश्वर कावरे, यांनी केले होते,

**नगर पंचायत बार्शीटाकळी**

**ता. बार्शीटाकळी जि. अकोला**
**ई- निविदा सूचना**

नगर पंचायत बार्शिटाकळी जिल्हा अकोला यांच्या वतीने बार्शिटाकळी हद्दीमध्ये Animaled Birthed Controled (ABC) कार्यक्रम / भटके कुत्रे नियंत्रण कार्यक्रमासाठी AWO निवडू करणे कामाची ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर दि. १४/०१/२०२६, रोजी प्रसिद्ध करण्यात आलेनी आहे. सदरची ई-निविदा दि. २१/०१/२०२६ सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत भरणा करण्यात येईल. इतर अटी व शर्ती http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. इच्छुकांनी आपल्या ई-निविदा उपरोक्त शासनाच्या संकेतस्थळावर ऑलाईन भरणा करावी.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत बार्शिटाकळी**



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# नगराध्यक्षांच्या निर्णायक मतामुळे भाजपची कोंडी

## ढाणकी नगरपंचायतीच्या उपाध्यक्षपदी दत्त दिगंबर वानखेडे

प्रतिनिधी १५ जानेवारी



**ढाणकी** : ढाणकी नगरपंचायतीच्या उपाध्यक्षपदासाठी झालेल्या चुरशीच्या निवडणुकीत अखेर नगराध्यक्षांच्या निर्णायक मतामुळे सत्तेचे गणित फिरले. समसमान संख्याबळामुळे अडकलेल्या या निवडणुकीत ढाणकी नगर विकास आघाडीचे दत्त दिगंबर वानखेडे यांची उपाध्यक्षपदी निवड झाली असून भाजपला सत्तेबाहेर राहावे लागले आहे.

१७ सदस्यांच्या नगरपंचायतीत कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नव्हते. भाजपकडे ७ सदस्य होते. दोन अपक्षांना सोबत घेऊन त्यांनी ९ सदस्यांचे संख्याबळ उभे करत ढाणकी शहर विकास आघाडी स्थापन केली होती. दुसरीकडे शिवसेना (शिंदे गट) ३, एम.आय.एम. ३, काँग्रेस २ आणि नगराध्यक्ष यांचा समावेश करत ढाणकी नगर विकास आघाडीचेही संख्याबळ ९ झाले होते.

दोन्ही बाजू समसमान झाल्याने उपाध्यक्षपदासाठीची निवडणूक अटीतटीची ठरली. अखेर पीठासन अधिकारी तथा नगराध्यक्षा अर्चना सुंदरकांता वासमवार यांनी विशेष अधिकाराचा वापर करत निर्णायक मत ढाणकी नगर विकास आघाडीच्या बाजूने दिले. त्यामुळे दत्त दिगंबर वानखेडे यांची उपाध्यक्षपदी निवड निश्चित झाली. निवडणूक प्रक्रियेदरम्यान मुख्याधिकारी अजय कुरवाडे यांनी प्रशासकीय कामकाज पाहिले. याच बैठकीत स्वीकृत सदस्यांच्या नियुक्त्यांवरही शिक्कामोर्तब करण्यात आले. भाजप गटाकडून रोहित वर्मा तर महाविकास आघाडीकडून संजय सल्लेवाड यांची स्वीकृत सदस्य म्हणून निवड करण्यात आली. या निकालामुळे भाजपची सत्ता स्थापनेची आशा मावळली असून ढाणकी नगर विकास आघाडीने आपले संख्याबळ कायम राखले आहे.

### समसमान संख्याबळ

■ ढाणकी नगरपंचायतीच्या उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीत नगराध्यक्षांच्या निर्णायक मतामुळे सत्तेचे गणित बदलले. समसमान ९–९ संख्याबळ असताना नगराध्यक्षा अर्चना सुंदरकांता वासमवार यांनी निर्णायक मत ढाणकी नगर विकास आघाडीच्या बाजूने दिले. त्यामुळे दत्त दिगंबर वानखेडे यांची उपाध्यक्षपदी निवड झाली. या निकालामुळे भाजपला सत्तेबाहेर राहावे लागले. निवडणूक प्रक्रियेत मुख्याधिकारी अजय कुरवाडे यांनी कामकाज पाहिले.

उपाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर दत्त दिगंबर वानखेडे यांच्या समर्थकांनी शहरात जल्लोष साजरा केला.

# मनरेगा योजना बंद पाडण्याचा डाव

## 'मनरेगा बचाव संग्राम' आंदोलन करणार : काँग्रेसचे नेते माणिकराव ठाकरे यांची माहिती

प्रतिनिधी १५ जानेवारी



**यवतमाळ** : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) बंद करण्याच्या केंद्र सरकारने कथित कट आखला आहे. काँग्रेस पक्षाच्या वतीने 'मनरेगा बचाव संग्राम' राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा निर्णय घेतल्याची माहिती काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माणिकराव ठाकरे यांनी यवतमाळ येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

माजी मंत्री माणिकराव ठाकरे म्हणाले की, १९७२ साली भीषण दुष्काळाच्या काळात शेतमजुरांना काम मिळत नव्हते. त्यावेळी जनतेच्या मागणीनुसार तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी रोजगार हमी योजना सुरू केली. या योजनेमुळे लाखो गरजू नागरिकांना रोजगार मिळाला. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, डॉ. मनमोहन सिंग पंतप्रधान असताना मनरेगा कायद्याच्या माध्यमातून देशातील नागरिकांना रोजगाराचा कायदेशीर अधिकार मिळाला. आजही ग्रामीण भागातील कोट्यवधी लोक या योजनेचा लाभ घेत आहेत. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या नावाने ही योजना सुरू करण्यात आली होती.

माणिकराव ठाकरे यांनी आरोप केला की, सध्याचे केंद्र सरकार मोठ्या उद्योगपतींच्या फायद्यासाठी काम करत असून मनरेगा योजना हळूहळू बंद करण्याचा डाव आखत आहे. या विरोधात काँग्रेस पक्ष देशभर आंदोलन उभारणार आहे. 'मनरेगा बचाव संग्राम' हे आंदोलन जिल्हा व गाव पातळीवर राबविण्याचा निर्णय घेण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

भाजप सरकारच्या जनविरोधी धोरणांना काँग्रेस पक्ष तीव्र विरोध करत राहील आणि गरीब, शेतमजूर तसेच कष्टकरी जनतेच्या हक्कांची लढाई सातत्याने सुरू ठेवणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रफुल्ल मानकर, अनिल गायकवाड उपस्थित होते.

## ट्रॅक्टरसह रेती जप्त

प्रतिनिधी १५ जानेवारी

**घाटंजी** : तालुक्यातील पारवा–सायफळ परिसरात विनापरवाना रेती वाहतूक होत असल्याची माहिती मिळताच घाटंजी महसूल विभागाच्या पथकाने धाड टाकली. या कारवाईत रेतीसह एक ट्रॅक्टर जप्त करण्यात आला. महसूल विभागातील अतुल सुनील कुळसंगे यांनी दिलेल्या तक्रारीवरून १२ जानेवारी रोजी पारवा पोलीस ठाण्यात नागेश वसंता राठोड यांच्यासह दोघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३/२ व महाराष्ट्र जमीन महसूल कायदा कलम ४८/८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त मुद्देमाल पुढील कारवाईसाठी ताब्यात ठेवण्यात आला.

# ट्रकची दुचाकीला धडक; दोन ठार

प्रतिनिधी १५ जानेवारी



**पांढरकवडा** : तालुक्यातील वणी-यवतमाळ मार्गावर उमरी गावाजवळ मंगळवारी झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील दोघे जागीच ठार झाले. तर एक तरुणी गंभीर जखमी झाली आहे.

विकास ज्ञानेश्वर सलाम (वय २६, रा. लिंगटी), पायल रोशन कुंभारे (वय २४, रा. लिंगटी) अशी मृतकांची नावे आहे. तर तनुजा राजू वाघाडे (वय १९, रा. सुना) ही तरुणी गंभीर जखमी झाली असून तिच्यावर उपचार सुरू आहेत. चंद्रपूर येथून सिमेंट घेऊन येणाऱ्या भरधाव ट्रक (क्र. एमएच ३४ बीझेड २९३२) ने होंडा शाईन दुचाकी (क्र. एमएच २९ सीएफ ०७७३) ला जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला.

अपघात इतका भीषण होता की दुचाकीचा पूर्णतः चुराडा झाला. घटनेची माहिती मिळताच पांढरकवडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. अपघातानंतर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.

या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या प्रकरणी पांढरकवडा पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर पेंढारकर करीत आहे.

# राजकीय अनास्थेचा फटका; उमरखेडचा कापूस उत्पादक वाऱ्यावर

प्रतिनिधी १५ जानेवारी

**उमरखेड** : सोयाबीनच्या घसरत्या उताऱ्यामुळे गेल्या वर्षापासून उमरखेड तालुक्यात कापसाचा पेरा वाढला आहे. मात्र उत्पादन वाढूनही शासकीय खरेदीअभावी 'पांढरे सोने' पिकवणारा शेतकरी अडचणीत सापडला आहे. राजकीय अनास्थेमुळे तालुक्यात अद्याप सीसीआयमार्फत कापूस खरेदी सुरू न झाल्याने व्यापाऱ्यांचे फावले असून शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागत आहे.

शेजारील महागाव तालुक्यात सीसीआय खरेदी सुरू असताना उमरखेडकडे दुर्लक्ष झाले आहे. सुमारे ९० हून अधिक गावांचा समावेश असलेल्या या तालुक्यात, विशेषतः बंदी भागात कापसाव्यतिरिक्त दुसरा पर्याय नसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. शासकीय खरेदी न झाल्यामुळे शेतकऱ्यांना आपला कापूस गुंज किंवा पुसदसारख्या दूरच्या ठिकाणी नेणे भाग पडत असून, वाहतुकीचा वाढीव खर्च त्यांच्या माथी पडत आहे. उमरखेड व ढाणकी येथे खरेदी केंद्र सुरू झाल्यास शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असता. मात्र आतापर्यंत ना सीसीआयची खरेदी सुरू झाली, ना स्थानिक जीन प्रेसमध्ये खासगी व्यापाऱ्यांनी खरेदीला सुरुवात केली. परिणामी मागील आठवड्यापर्यंत व्यापाऱ्यांकडे कापसाचे दर केवळ सात हजार २०० ते सात हजार ३०० रुपयांपर्यंतच मर्यादित राहिले. यावर्षी सात महिन्यांच्या अतिवृष्टीमुळे कापसाचा उतारा आधीच घटला आहे. त्यातच प्रशासन व लोकप्रतिनिधींच्या उदासीनतेमुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. निसर्गाच्या अवकृपेनंतर आता राजकीय अवकृपेचा फटका बसत असल्याची भावना शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे.

जीन प्रेसचे व्यवस्थापक केशव तिवारी यांच्याशी संपर्क साधला असता, आपण नुकतेच रुजू झाल्याने या विषयासंदर्भात सविस्तर माहिती उपलब्ध नसल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली.

### जीन प्रेस अध्यक्षांचे म्हणणे

■ या संदर्भात जीन प्रेसचे अध्यक्ष शिवाजीराव माने यांनी सांगितले की, व्यापाऱ्यांना आकर्षित करण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. मात्र कुठल्याही व्यापाऱ्याने येथे खरेदीसाठी तयारी दाखवली नाही. तसेच सध्या सीसीआयमार्फत कापूस खरेदी सुरू करण्यासाठी आवश्यक त्या पुरेशा सुविधा उपलब्ध नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# पुसद नगरपालिकेच्या उपाध्यक्षपदी अर्चना जगताप

## स्वीकृत सदस्य पदी निशांत बयास, निखिल गादेवार, वसीम अहमद

प्रतिनिधी १५ जानेवारी






**पुसद** : पुसद नगरपालिकेच्या उपाध्यक्षपदी भाजपच्या नगरसेविका अर्चना जगताप यांची निवड करण्यात आली. या निवड प्रक्रियेच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष मोहिनी इंद्रनील नाईक होत्या. नगरपालिकेच्या पहिल्याच सर्वसाधारण सभेला अपक्ष नगरसेवक नीरज पवार अनुपस्थित होते.

उपाध्यक्ष पदासाठी झालेल्या निवडणुकीत अर्चना जगताप यांना २२ मते मिळाली, तर विरोधी उमेदवार काँग्रेसचे शेख जब्बर शेख युसुफ यांना ९ मते मिळाली. संख्याबळ लक्षात घेता राष्ट्रवादी काँग्रेसकडे बहुमत असतानाही भाजपला उपाध्यक्षपदाची संधी देण्यात आली असून हे पद पाच वर्षांसाठी देण्यात आले आहे.

दरम्यान, नगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसने भाजपला सोबत घेत सत्तास्थापन केली आहे. उपाध्यक्ष पदासाठी भाजपकडून दिपाली जाधव व दीपक काळे हे इच्छुक होते. मात्र पक्षांतर्गत चढाओढीत अर्चना जगताप यांना संधी देण्यात आली. निरीक्षक राजू पडगिलवार यांनी नगरसेवकांच्या बैठकीत अर्चना जगताप यांच्या नावाला हिरवा कंदील दिल्यानंतर त्यांची निवड निश्चित झाली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसकडून निशांत बयास व निखिल गादेवार यांची, तर काँग्रेसकडून ॲड. वसीम अहमद यांची स्वीकृत सदस्य म्हणून निवड करण्यात आली. निशांत बयास हे माजी नगराध्यक्ष दिवंगत सतीश बयास यांचे चिरंजीव आहेत. निखिल गादेवार यांना यापूर्वी दोन वेळा पराभव पत्करावा लागला होता. मात्र ते राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या मित्र परिवारातील असल्याने यावेळी त्यांना संधी देण्यात आल्याची चर्चा आहे. ॲड. वसीम अहमद हे काँग्रेसचे नगरसेवक व गटनेते डॉ. मोहम्मद नदिम यांचे धाकटे बंधू आहेत.

नवनिर्वाचित उपाध्यक्ष अर्चना जगताप तसेच स्वीकृत सदस्यांचे नगराध्यक्ष मोहिनी इंद्रनील नाईक यांनी स्वागत करून त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

# पारवा पोलीस ठाण्यात विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रम

प्रतिनिधी १५ जानेवारी

**पारवा** : रेझिंग डे सप्ताहाच्या अनुषंगाने पारवा पोलीस ठाण्याच्या वतीने बाबासाहेब देशमुख विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पोलीस ठाण्यात आमंत्रित करून विभागाचे दैनंदिन कामकाज व जबाबदाऱ्यांची माहिती देण्यात आली.

यावेळी पोलीस ठाण्यातील कार्यपद्धती, नागरिकांच्या तक्रारी नोंदविण्याची प्रक्रिया तसेच आपत्कालीन परिस्थितीत उपयुक्त ठरणाऱ्या डायल ११२ सेवेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पोलिसांकडील शस्त्रांची माहिती देताना त्यांच्या वापराचे नियम व सुरक्षिततेचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. सायबर गुन्ह्यांविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, ऑनलाइन फसवणूक, सायबर बुलिंग याबाबत जागृती करण्यात आली. तसेच बालविवाहाचे दुष्परिणाम, महिला व बालकांवरील गुन्हे, संबंधित कायदे, प्रतिबंधात्मक उपाय आणि तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया याची सविस्तर माहिती देण्यात आली. कार्यक्रमास सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत चौधरी प्रमुख उपस्थित होते.

त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत कायद्याचे पालन, शिस्त आणि समाजातील जबाबदार नागरिक म्हणून वागण्याचे महत्त्व पटवून दिले.

यावेळी बाबासाहेब देशमुख विद्यालयाचे मुख्याध्यापक चौलमवार नारलावार, पोलीस जमादार बनसोड, विद्यालयातील विद्यार्थी व पोलीस कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पोलीस प्रशासनाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेबाबत जागरूकता वाढल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# पत्रकार क्रिकेट चषक २०२६ : वकील संघ विजेता; पत्रकार संघ उपविजेता

प्रतिनिधी १५ जानेवारी




**पुसद** : राष्ट्रीय पत्रकार दिनाचे औचित्य साधून पत्रकार क्रिकेट क्लब, पुसद यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली सहा दिवसीय पत्रकार क्रिकेट चषक २०२६ ही भव्य क्रिकेट स्पर्धा उत्साहात पार पडली. पुसद उपविभागातील १६ विविध शासकीय कार्यालयांमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेत दर्जेदार व चुरशीचे क्रिकेट सादर केले.

स्पर्धेच्या उपांत्य फेरीत वकील संघाने घरकुल अभियंता संघाचा पराभव करून अंतिम फेरीत धडक मारली, तर पत्रकार संघाने बलाढ्य डॉक्टर संघावर मात करत फायनलमध्ये प्रवेश केला. अंतिम सामन्यात अनुभवी खेळाडूंच्या प्रभावी कामगिरीच्या जोरावर वकील संघाने बाजी मारत विजेतेपद पटकावले. पत्रकार संघ उपविजेता ठरला. घरकुल अभियंता संघाने तृतीय, तर डॉक्टर संघ चौथ्या क्रमांकावर राहिला.

चारही विजेत्या संघांना कै. पै. बाबाराव लेवेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ रमेश चव्हाण यांच्याकडून देण्यात येणाऱ्या आकर्षक ट्रॉफी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंडियन बार कौन्सिलचे सदस्य व महाराष्ट्र–गोवा बार कौन्सिलचे माजी अध्यक्ष ॲड. आशिष देशमुख होते.

प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. मोहम्मद नदीम, ॲड. वनिता पवार, परमेश्वर जयस्वाल, पांडुरंग व्यवहारे, विश्वजीत सरनाईक, नाना बेले, किशोर पानपट्टे, पैलवान सतीश कानडे, पत्रकार संघाचे अध्यक्ष ललित सेता, नगरसेवक विठ्ठल खडसे, डॉ. निलेश भंडारी, दत्तराव जाधव, किशोर कांबळे, ॲड. भारत जाधव, गुलाम अहमद, अनिस चव्हाण, डॉ. शैलेश नवथळे, रेश्मा लोखंडे, प्रदीप नरवाडे आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी पत्रकार क्रिकेट क्लबचे अध्यक्ष मारोती भस्मे, सचिव विजय निखाते, उपाध्यक्ष मोहम्मद मुबसिर शेख व विनय राठोड, कार्याध्यक्ष बाबा खान, कोषाध्यक्ष फाहेद खान, सहसचिव मनीष दशरथकर, संघटक अनिल चव्हाण पाटील व राजेश ढोले, संघटक शब्बीर शेख, सल्लागार प्रदीप नरवाडे, संजय रेककावार, प्रकाश खिल्लारे व शंकर माहुरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

तसेच प्रमुख मार्गदर्शक बाबाराव उबाळे, अब्दुल हमीद शेख, दीपक हरीमकर, प्रकाश लामने, शेख महेबूब यांच्यासह कार्यकारिणी सदस्य हनीफ शेख, आकीब रीजवी, शारिक शेख, राजू सोनवणे, पवन चव्हाण, राहुल सुरोशे, नवाज अली, मजीद खान, ज्ञानेश्वर मेटकर, दीपक धर्माधिकारी, राम राठोड तसेच सर्व पत्रकार बांधवांनी अथक परिश्रम घेतले. पंचमंडळींच्या निष्पक्ष निर्णयामुळे कोणताही वाद न होता स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडली.

# महागाव-गुंज रस्त्यावर पॅचवर्कचा 'घोटाळा'

प्रतिनिधी १५ जानेवारी




**महागाव** : महागाव ते गुंज दरम्यानचा डांबरी रस्ता सध्या अक्षरशः गलीतगात्र अवस्थेत असून या मार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. रस्ते विकासाचा दावा करणाऱ्या पुसद सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भ्रष्टाचाराचा कळस या मार्गावरील पॅचवर्कच्या कामातून समोर आला आहे. रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांवर तात्पुरत्या स्वरूपाची थिगळे लावून केवळ लिपापोती केली जात असून, 'रस्त्यात खड्डे आहेत की संपूर्ण रस्ताच खड्ड्यात आहे' असा प्रश्न प्रवाशांना पडला आहे. हा रस्ता नव्याने आणि दर्जेदार पद्धतीने बांधण्याची नितांत गरज असताना, दरवर्षी पॅचवर्कच्या नावाखाली शासनाच्या कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी केली जात असल्याचा गंभीर आरोप नागरिकांनी केला आहे.

**पुसद बांधकाम विभागाचे दुर्लक्ष**

या मार्गावर अत्यंत सुमार दर्जाचे डांबर, गिट्टी व चुरी वापरून 'पैसा वाचवा, पैसा जिरवा' हा एककलमी कार्यक्रम राबविला जात असल्याचे उघड झाले आहे. प्रत्यक्ष कामाचा दर्जा पाहिल्यानंतर ठेकेदार आणि अभियंत्यांचे उघड संगनमत असल्याचे दिसून येते. गुंज ते फुलसावंगी या सुमारे २० किलोमीटर रस्त्याच्या डागडुजीसाठी तब्बल १ कोटी रुपयांचे पॅचवर्क कंत्राट मंजूर करून घेण्यात आले. यात ठराविक कंत्राटदारांना पोसण्यासाठी आणि स्वतःचे खिसे भरण्यासाठी हा सर्व घाट घातला गेल्याचा आरोप होत आहे. २०१९ पासून हा रस्ता प्रवासायोग्य राहिलेला नाही, परिणामी सर्व खाजगी वाहतूक महागाव-खडका-शिरपूर या पर्यायी मार्गाने वळवावी लागत आहे. वापरात नसलेल्या रस्त्यावर दरवर्षी पॅचेसच्या नावाखाली लाखो रुपये हडप करण्याचा धंदा सुरू असून या संपूर्ण 'गौडबंगालाची' उच्चस्तरीय चौकशी करून दोषींना कायमस्वरूपी ब्लॅकलिस्ट करण्याची मागणी जोर धरत आहे. या संदर्भात शाखा अभियंता मयूर वंजारी यांनी आपली बाजू मांडताना सांगितले की, "या संदर्भात आम्ही सिमेंट काँक्रीट रस्ता करण्यासाठी वारंवार प्रस्ताव दिलेला आहे. तसेच विद्यमान आमदार किशन वानखेडे यांना सुद्धा प्रस्ताव पाठविला आहे, परंतु तो अद्याप प्रलंबित आहे."

शासकीय यंत्रणेच्या या दिरंगाईमुळे आणि निकृष्ट कामामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप असून, या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी लवकरच तहसील कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला आहे.

### सीआरएफ फंडामधून नवीन रस्त्याच्या कामाचा प्रस्ताव दाखल करणार

■ कलगाव ते गुंज रस्त्यावर मोठ्या प्रमाणात जड वाहतूक सुरू असुन त्यामुळे रस्त्याची अवस्था नेहमीच खराब होत आहे. त्यामुळे या रस्त्याच्या सिमेंट काँक्रिट च्या कामासाठी केंद्र सरकारच्या सीआरएफ निधीमधून मंजुरी मिळण्यात यावी याकरिता नव्याने प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.

# जिजाऊ ज्ञान मंदिरात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती

प्रतिनिधी १५ जानेवारी




**महागाव** : तालुक्यातील जिजाऊ ज्ञान मंदिर इंग्लिश मिडीयम स्कूल, सवना येथे १२ जानेवारी रोजी राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गणेशराव देशमुख होते. प्रमुख पाहुणे म्हणून महागाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक धनराज निळे उपस्थित होते.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैष्णवी इडलीवार हिने केले. झाडे यांनी राजमाता जिजाऊ यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी भाषणातून राजमाता जिजाऊ यांच्या कार्याचा गौरव केला. प्रमुख पाहुणे पोलीस निरीक्षक धनराज निलेश यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, 'राजमाता जिजाऊ यांनी शिवराय घडवले, तसेच पालकांनीही आपल्या मुला-मुलींवर योग्य संस्कार करून देशासाठी चांगले नागरिक घडवावेत,' असे आवाहन केले. शाळेचे अध्यक्ष डॉ. अमोल सुभाषराव देशमुख यांनी पोलीस निरीक्षक धनराज निळे यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला. यावेळी सवना गावाचे सरपंच वसंता धुर्वे, उपसरपंच बापूसाहेब देशमुख, वेणी गावचे ज्येष्ठ नागरिक साहेबराव पुंडे, अप्रोच उपस्थित होते. यानंतर रंगोत्सव स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदके व प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. शाळेच्या मुख्याध्यापिका राणी प्रवीण देशमुख यांनी आभार मानले. कार्यक्रमाला शिक्षकवृंद, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कु. दळवी यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
गुरूवार दि. १५ जानेवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## एकलव्य मॉडेल निवासी शाळा प्रवेश परीक्षेसाठी अर्ज मागविले

**वाशीम :** शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी इंग्रजी माध्यमाच्या एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल पब्लिक स्कूलच्या प्रवेशासाठी दि. १ मार्च २०२६ रोजी प्रवेश परीक्षा आयोजित करण्यात येणार आहे. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्या कार्यक्षेत्रातील वाशिम जिल्ह्यातील सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, जिल्हा परिषद, नगरपालिका तसेच शासनमान्य अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी, ६ वी, ७ वी व ८ वी मध्ये शिक्षण घेत असलेले अनुसूचित जमातीचे विद्यार्थी या प्रवेश परीक्षेस पात्र असतील. पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज संबंधित शाळांचे मुख्याध्यापक यांनी भरून घेऊन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला यांच्या कार्यालयाकडे सादर करावेत. विहित नमुन्यातील अर्ज संबंधित आदिवासी शासकीय/अनुदानित आश्रमशाळेचे मुख्याध्यापक किंवा प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला येथे विनामूल्य उपलब्ध असून भरलेले अर्ज दि. ३० जानेवारी २०२६ पर्यंत मुख्याध्यापकांमार्फत सादर करणे आवश्यक आहे.

### कोयाळी - नेतन्सा - डोणगावकडे जाणाऱ्या...

# रस्त्याचे चुकीचे काम, भ्रष्टाचारातून मिळाला दाम !

***नुकसानग्रस्त शेतकऱ्याची वरिष्ठांकडे तक्रार * संबंधित विभागाचा कारवाई न करण्याचा करार**

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात येत असलेल्या कोयाळी जाधव ते नेतन्सा, डोणगावकडे जाणाऱ्या प्रधानमंत्री ग्राम सडक योजना भाग - ३ या योजनेतून रस्त्याचे काम करण्यात आले आहे. मात्र सदर कामात अनियमितता आणि चुकीचे काम येत असल्याची तक्रार कोयाळी जाधव येथील एका अल्पभूधारक शेतकऱ्यांने केली आहे. धक्कादायक बाब म्हणजे प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या कामावर संनियंत्रण करणारे अभियंता यांची ठेकेदारांसोबत आर्थिक हातमिळवणी असल्याने सदर काम जाणीवपूर्वक नियमबाह्य व थातुरमातुर करण्यात येत असल्याचा आरोप कोयाळी येथील अल्पभूधारक युवा शेतकरी मोहन बबन जाधव यांनी केला आहे. सदर चुकीच्या कामामुळे शेतकऱ्याच्या शेतात पाणी घुसून प्रचंड नुकसान झाले आहे. चुकीच्या पद्धतीने होत असलेल्या पुलाच्या कामाची चौकशी व कामातील भ्रष्टाचार याची चौकशी व्हावी अशी मागणी मोहन जाधव यांच्याकडून करण्यात आली आहे.








प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या कामात बेजबाबदार ठेकेदारांकडून काम निकृष्ट दर्जाचे करणे आणि नियमांचे पालन न करता स्वार्थासाठी नियमबाह्य कामे करणे ही आता नित्याचीच बोंब होऊन बसली आहे. मात्र याबाबत वारंवार तक्रारी दाखल होऊनही सबंधित प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कुठलीही दखल न घेणे ही सर्वात मोठी आश्चर्यकारक बाब ठरत आहे. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेसारख्या महत्वाच्या योजनेत ठेकेदाराच्या मनमानीमुळे कोयाळी जाधव येथील एका गरीब शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान झाले असल्याची माहिती हाती आली आहे. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या कामात अनियमितता व चुकीच्या पद्धतीने काम करण्यात आले असल्याची तक्रार मुख्य कार्यकारी अभियंता, कार्यालय प्रधानमंत्री ग्राम सडक योजना वाशिम यांच्याकडे करण्यात आली आहे.सदर तक्रारीत म्हटले आहे की,कोयाळीकडून नेतन्सा डोणगावकडे जाणाऱ्या रस्त्यावरील पुलाचे काम चुकीच्या पद्धतीने होत असून, या चुकीच्या कामामुळे माझे कधीही भरून न निघणारे नुकसान होत असल्याचा आरोप सबंधित शेतकऱ्याने केला आहे. प्रस्तावित पूल व आराखड्यातील रस्ता विसंगत असल्याचा आरोप सुद्धा करण्यात आला आहे.

परिणामी प्रधानमंत्री ग्राम सडक योजना नव्हे; तर भ्रष्टाचार बेधडक योजना असल्याचे कोयाळी येथील नागरिक अपरोधाने बोलत आहेत. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना ही भारत सरकारची एक महत्त्वाची योजना आहे. ग्रामीण भागातील सर्व वाडी - वस्त्यांना बारमाही जोडल्या जावे या स्तुत्य हेतूने या योजनेसाठी केंद्र सरकार करोडो रुपयांचा निधी खर्ची घालत आहे. जेणेकरून ग्रामीण भागाचा सामाजिक, आर्थिक विकास होईल व आरोग्य, शिक्षण आदि सोईसुविधा सहज उपलब्ध होण्यासाठी लहान,मोठ्या वाडी -वस्त्या मुख्य बाजारपेठांशी जोडल्या जाव्यात या हेतूने सदर योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. परंतु सदर योजनेचे संनियंत्रण करणारी यंत्रणाच कुचकामी ठरत असल्याने ठेकेदारांचा मनमानी कारभार सुरू असल्याचा आरोप सामान्य नागरिक करत आहेत. विशेष बाब म्हणजे या गंभीर बाबीकडे स्थानिक लोकप्रतिनिधी जाणीवपूर्वक कानाडोळा करत असल्याने कुठेतरी पाणी मुरत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. कोयाळी जाधव नजीकच्या पुलाच्या कामाने या योजनेतील कामाचे ठेकेदार आणि अधिकारी यांचे पितळ उघडे पडत असून कामातील अनियमिततेचे वास्तव उजागर होत आहे.

या गंभीर प्रकाराची वरिष्ठांकडून चौकशी व्हावी व एका गरीब शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना न्याय द्यावा अशी अपेक्षा सर्व सामान्य नागरिक व्यक्त करीत आहेत.

> माझ्या शेताच्या जवळ असलेल्या एका नाल्यावर प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतून पुलाचे काम सुरू आहे. सदर काम कंत्राटदार व्हि. बी. जाधव रा.चांडस यांनी घेतले आहे. मात्र कंत्राटदार यांनी रस्त्याच्या व पुलाच्या कामात शासकीय अंदाजपत्रकाला हेतुपुरस्पर बगल दिली आहे. या कामाची सखोल चौकशी करून मला न्याय मिळवून द्यावा अशी माझी मागणी आहे.
>
> **मोहन बबन जाधव**
> तक्रारदार शेतकरी, कोयाळी बू. ता. रिसोड.

## थोडक्यात

### जिजाऊची शिकवण प्रत्येक महिलांनी अंगीकरावी

• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

शाक्यमुनी मानव विकास प्रतिष्ठान, हिंगोली शाखा मंगरुळपीर व प्रेरणा समाजसेवी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ यांची जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी एस. एम. व्ही. प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्री देवानंद राऊत यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला प्रेरणा समाजसेवी संस्थेचे अध्यक्ष आशिष इंगोले , निता राठोड मॅडम यांनी मार्गदर्शन केले. आभार प्रदर्शन प्रेरणा इंगोले मॅडम यांनी केले.



### युवा दिनानिमित्त पिंप्री अवगण येथे कार्यक्रम

• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

पिंप्री अवगण येथील परमहंस झोलेबाबा विद्यालय तथा स्व. मधुकरराव ल. सपकाळ कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालयात जिजामाता व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त युवा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव व महाविद्यालयाचे प्राचार्य सुनिल सपकाळ साहेब उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे दीक्षित सर यांनी जिजामाता व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. युवकांमध्ये आत्मविश्वास, ध्येयवाद व राष्ट्रभक्ती निर्माण होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. दिव्या राठोड हिने केले, तर आभार प्रदर्शन गोपाल , यांनी केले. कार्यक्रमाला राठोड , गौपाल भुसारी , दीक्षित , कुलकर्णी , शिंगणे , वानखडे , लांभाडे , गोगे , गोरव, अवगण सर तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी सतीश ग्याने उपस्थित होते.



### कामगाराचे प्रश्न शासन दरबारी !



• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

कर्मचाऱ्यांचे ओळखपत्र त्यांच्या आगारामध्ये वाटप, बडनेरा आगारातील चालक भोकरे यांना मिळालेल्या अ श्रेणी वेतन वाढीतील फरक, वरुड आगारातील चालक वाहकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, कामगार कल्याण मंडळाच्या विविध योजनांची माहिती रा. प. कर्मचारी पर्यंत पोहोचविणे इत्यादी प्रश्न सदर निवेदनात मांडण्यात आले. कामगारांच्या सदर समस्यांची सोडूवणूक करण्याचे आश्वासन विभाग नियंत्रक श्री बेलसरे साहेब यांनी दिले. यावेळी अमरावती माजी विभागीय सचिव व कामगार सेनेचे ज्येष्ठ मार्गदर्शक बाळासाहेब राणे.अमरावती प्रदेश सचिव मोहनभाऊ टेकाडे, अमरावती विभागीय सचिव दिनेशभाऊ शेळके.अमरावती विभागीय अध्यक्ष किशोरभाऊ हेरोडे, अमरावती आगार सचिव शिवाभाऊ भारती अमरावती आगार अध्यक्ष ज्ञानेश्वरभाऊ खोंड हे उपस्थित होते.

## शेतकऱ्याला मारणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

मंगरूळपिर तालुक्यातील गोगरी मध्ये तालुका कृषि अधिकाऱ्याच व्हिडीओ का काढला याचा राग धरून एका शेतकऱ्याला कृषि अधिकाऱ्याने मारहाण केल्याची घटना समोर आली आहे.सचिन कांबळे असे या कृषि अधिकाऱ्याचा नाव असून ऋषिकेश पवार असं मारहाण झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. या घटनेनंतर शेतकऱ्याकडून कृषी अधिकाऱ्यावर कारवाईची मागणी सामाजिक कार्यकर्ते किशोर देशमुख यांनी केली आहे.

वाशिम जिल्ह्याच्या मंगरूळपीर तालुक्या अंतर्गत असलेल्या गोगरी मध्ये मनरेगा अंतर्गत लागवड केलेल्या फळबागेची मजुरी मागील चार महिन्यांपासून रखडली होती..हे अनुदान मिळण्याच्या मागणीसाठी जिल्हा कृषी अधिकाऱ्यांकडे शेतकऱ्यांनी तक्रार केली होती.दरम्यान कृषी अधिकारी आज पाहणीसाठी आले असतांना एका शेतकऱ्याकडून कृषी अधिकाऱ्याचं पाहणी करतानाचा व्हिडिओ काढत होता. या तक्रारीचा राग मनात धरून व्हिडिओ का काढतो म्हणत थेट कृषी अधिकाऱ्याने शेतकऱ्याला मारहाण करून बूट उगारला आणि अश्लील शिवीगाळ सुद्धा करण्यात आली आहे.इतकेच नव्हे कृषी



अधिकाऱ्याकडून शेतकऱ्याचं मोबाईल सुद्धा हिसकावण्यात आला आहे.या घटनेनंतर मारहाण करणाऱ्या तालुका कृषी अधिकारी सचिन कांबळेवर कारवाईची मागणी होत आहे.मात्र आता या कृषी अधिकाऱ्यावर कारवाई होणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### कृषी अधिकाऱ्याची दादागिरी, दाखल करा फौजदारी ...

तक्रारीनंतर तालुका कृषी अधिकारी पाहणीसाठी गोगरी येथे आले असताना, एका शेतकऱ्याने पाहणीचा व्हिडीओ मोबाईलमध्ये चित्रीत केला.याच गोष्टीचा राग मनात धरत 'व्हिडीओ का काढतोस' असे म्हणत कृषी अधिकाऱ्याने शेतकऱ्यावर हल्ला केला, बूट उगारून मारहाण केली, अश्लील शिवीगाळ केली, आणि शेतकऱ्याचा मोबाईल जबरदस्तीने हिसकावून घेतला. शेतकऱ्यांमध्ये संताप, कारवाईची जोरदार मागणी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी आलेल्या अधिकाऱ्यांकडूनच अशी गुंडगिरी आणि दादागिरी झाल्याने परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे.'हा अधिकारी शेतकऱ्यांचा सेवक आहे की मालक ' असा सवाल उपस्थित केला जात आहे.मारहाण करणाऱ्या तालुका कृषी अधिकारी सचिन कांबळे यांच्यावर तात्काळ निलंबन व फौजदारी कारवाई करावी, अशी जोरदार मागणी शेतकरी व सामाजिक संघटनांकडून केली जात आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून वाशिममधील १७५ शाळांचे आमूलाग्र रूपांतरण

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

राज्यातील सार्वजनिक शिक्षण व्यवस्था खऱ्या अर्थाने सक्षम, आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण व्हावी, या दूरदृष्टीतून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संकल्पित केलेला 'स्कूल ट्रान्सफॉर्मेशन प्रोजेक्ट (एसटीपी)' वाशिम जिल्ह्यात शैक्षणिक क्रांती घडवत आहे. ग्रामीण आणि जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांनाही खासगी शाळांप्रमाणेच आधुनिक सुविधा, दर्जेदार अध्यापन आणि उज्ज्वल भविष्याच्या संधी मिळाव्यात, या मुख्यमंत्र्यांच्या ठाम भूमिकेतून हा प्रकल्प आकारास आला आहे.

नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एनपीसीआय) आणि लर्निंग लिंक्स



फाउंडेशन (एलएलएफ) यांच्या सहकार्याने आणि महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभाग व जिल्हा परिषद वाशिम यांच्या समन्वयाने ८ डिसेंबर २०२१ रोजी या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची सुरुवात झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणारा हा प्रकल्प केवळ शाळांची डागडुजी करणारा नसून, पूर्ण शाळा परिवर्तन घडविणारा सर्वसमावेशक शैक्षणिक मॉडेल ठरत आहे.

## रिसोड तालुक्यात अवैध सावकारांवर धडक कारवाई !

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

सहकार विभागाकडे प्राप्त झालेल्या रिसोड तालुक्यातील अवैध सावकारी व्यवहारासंबंधीच्या दोन तक्रारींची चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ चे कलम १६ अंतर्गत गैर अर्जदार अब्दुल रऊफ शेख चांद, रा. बाल समंदर, चांदनी चौक, रिसोड, ता. रिसोड जि. वाशिम आणि भगबान तुकाराम गुडधे, रा. नागझरी–गोंदाळा, ता. रिसोड जि. वाशिम यांच्या राहत्या घरी सहकार विभाग व पोलिस विभागाच्या दोन पथकांमार्फत दि. ९ जानेवारी २०२६ रोजी झडतीची कार्यवाही करण्यात आली. गैर अर्जदारांच्या ठिकाणी करण्यात आलेल्या झडतीदरम्यान पुढील चौकशीसाठी काही महत्त्वाचे दस्तऐवज ताब्यात घेण्यात आले असून सदर प्रकरणी सावकारी कायद्यान्वये पुढील चौकशी सुरू आहे. ही कार्यवाही जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, पोलिस अधीक्षक अनुज तारे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम गितेशचंद्र साबळे यांच्या नियंत्रणाखाली पार पाडण्यात आली.या कार्यवाहीमध्ये सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, रिसोड गजानन फाटे, सहाय्यक निबंधक (प्रशासन), अंतर्गत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम आर. आर. सावंत, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वाशिम (पथक प्रमुख) एम. डी. कच्छवे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मालेगाव (पथक प्रमुख) आर. व्ही. आकुलवार, सहकार अधिकारी श्रेणी १, रिसोड सिद्धार्थ पाटील, सहकार अधिकारी श्रेणी १, वाशिम जे. एस. सहारे, मुख्य लिपिक, वाशिम पी. आर. वाडेकर, सहाय्यक सहकार अधिकारी, वाशिम आर. एन. शेख, सहकार अधिकारी श्रेणी १, मालेगाव एस. के. खान, मुख्य लिपिक, मालेगाव के. व्ही. तलवारे, सहाय्यक सहकार अधिकारी, मालेगाव बी. ए. इंगळे, मुख्य लिपिक, रिसोड एस. बी. रोडगे, सहाय्यक सहकार अधिकारी, रिसोड व्ही. बी. राठोड, कनिष्ठ लिपिक, रिसोड आकाश बेले तसेच पोलिस विभाग व महसूल विभागातील कर्मचारी यांनी सहभाग घेतला.



### प्रलंबित मागण्या व फेस रिडिंग ॲपच्या सक्ती बाबत

## पटवारी संघाचे आंदोलन !

• सिटी न्युज ब्युरो @ कारंजा •

प्रलंबित मागण्या मान्य न करता फेस रीडिंग ॲप यवतमाळ जिल्हाधिकारी यांनी सक्तीचे केल्यामुळे कारंजा येथील पटवारी संघटने कडून काळया फिती लागून आंदोलन,विदर्भ पटवारी संघ नागपूर चे वतीने सविनय निवेदन सादर करण्यात आले,संदर्भ क्र.१ नुसार विदर्भ पटवारी संघ नागपूर जिल्हा शाखा यवतमाळ चे वतीने यवतमाळ जिल्ह्यातील ग्राम महसूल अधिकारी यांच्या अनेक वर्षापासून प्रलंबित आर्थिक व सेवाविषयक मागण्यांसाठी सध्या जिल्हास्तरावर तिव्र आंदोलन सुरु आहे.हे आंदोलन सोडवण्या ऐवजी जिल्हा प्रसासानाकडून ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी



संवर्गाची मुस्कटदाबी केली जात आहे.

या संदर्भात खालील वस्तूस्तिथी आपले निदर्शनास आणून देऊ इच्छितो.जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी संघटनेचे शिष्ठमंडळास दिनांक ०२/०१/२०२६ रोजी चर्चेकरिता बोलाविले होते परंतु मा जिल्हाधिकारी महोदयांनी प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक विचार करण्याऐवजी जो पर्यंत फेस रिडिंग ?प डाउनलोड करणार नाही तोपर्यंत इतर मागण्या निकाली निघणार नाही.अशी आडमुठी व टोकाची भूमिका घेतली.तसेच शिष्ठमंडळास अपमानास्पद वागणूक देऊन दबावतंत्राचा वापर केला. प्रलंबित मागण्या निकाली काढण्यासाठी फेस रिडिंग ॲप डाउनलोड करण्याची अट घालणे आणी कर्मचाऱ्यांना धमकावणे हे अत्यंत अन्यायकारक असून सनदशीर व लोकशाही मार्गाने सुरु असलेल्या आंदोलनाला चिरडण्याचा हा प्रकार आहे. दि. १४/०१/२०२६ रोजी यवतमाळ जिल्ह्यात सुरु असलेल्या आंदोलनाला पाठींबा देण्यासाठी व यवतमाळ जिल्हा प्रशासनाचा निषेध म्हणून संपूर्ण विदर्भातील ११ जिल्ह्यातील ग्राम महसूल अधिकारी काळ्या फिती लाऊन कामकाज करतील,दि. १९/०१/२०२६ रोजी अमरावती प्रशासकीय विभागातील विदर्भ पटवारी संघाचे सर्व पदाधिकारी व यवतमाळ जिल्ह्यातील ग्राम महसूल अधिकारी मा.विभागीय आयुक्त कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करतील.दि.२७/ ०१/२० २६ रोजी मा. विभागीय आयुक्त कार्यालयअमरावती येथे मोर्चाचे आयोजन करण्यात येईल.

## वाशिममध्ये जिल्हास्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सवाचे आयोजन

### चिमुकल्यांच्या कलागुणांना मिळणार उधाण

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

बालकांमधील सुप्त कलागुणांना वाव देत त्यांच्यात आत्मविश्वास, बंधुभाव व सांघिक भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने वाशिम येथे जिल्हास्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सव २०२५–२६ चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. १५ ते १७ जानेवारी २०२६ या कालावधीत पी. एम. श्री जवाहर नवोदय विद्यालय, क्रीडांगण येथे हा महोत्सव होत असून बालकल्याण क्षेत्रात कार्यरत शासकीय व स्वयंसेवी संस्थांतील तसेच बालसंगोपन योजनेअंतर्गत पुनर्वसनासाठी दाखल असलेल्या अनाथ, निराधार व गरजू बालकांचा मोठ्या संख्येने सहभाग लाभणार आहे.

महोत्सवाचे उद्घाटन १५ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते होणार आहे. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, बाल न्याय मंडळाच्या अध्यक्षा अंजली फक्राबादकर, बाल कल्याण समितीच्या अध्यक्षा डॉ. अलका मकासरे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. दिनांक १६ जानेवारी रोजी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून यात नृत्य, गायन, नाट्य, एकांकिका, चित्रकला आदी स्पर्धांद्वारे बालकांनी आपल्या कौशल्याचे सादरीकरण केले.


# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com




# लोकशाही बळकट करा

**अकोला** : लोकशाहीच्या उत्सवाला सुरूवात झाली असून, आम्ही लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान केले आहे, आपणही या उत्सवात सहभागी होऊन लोकशाही व शहराच्या विकासासाठी मतदान करावे, असे आवाहन शहरातील नागरिकांना वरिष्ठ नेत्यांनी केले. शहरातील अनेक वरिष्ठ नेते व गणमान्य नागरिकांनी आज कुटूंबासह मतदान करुन आपला मुलभूत हक्क बजावला आहे.















## सत्ता भाजपची तर महापौर युतीचा होईल : आमदार रणधीर सावरकर

प्रतिनिधी १५ जानेवारी

**अकोला** : महापालिकेत सत्ता भारतीय जनता पक्षाची असेल आणि महापौर युतीचा होईल असे आमदार रणधीर सावरकर यांनी महापालिका निवडणुकीच्या मतदाना दरम्यान आर आर सी नेटवर्कशी बोलताना सांगितले. अकोलेकर मतदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टी नेतृत्वावर विश्वास ठेवून मतदान केले आहे. महापालिकेच्या माध्यमातून नागरी समस्या हाताळून नागरिकांना सोयी सुविधा उपलब्ध करून देऊ. स्वच्छता, रस्ते, पाणी तसेच मुलभूत सुविधावर आमचा फोकस राहील असे आमदार रणधीर सावरकर म्हणाले.

## मतदार याद्यांमधील घोळामुळे अनेक ठिकाणी गोंधळ



प्रतिनिधी १५ जानेवारी

**अकोला :** महानगर पालिकेच्या निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या मतदारांच्या याद्यामध्ये मो'ऱ्या प्रमाणात घोळ झाल्याचे दिसून आले. काही मतदारांच्या नावांमध्ये बदल झाला होता तर काही नावेच मतदार यादीमध्ये नसल्याने त्यांचा गोंधळ उडाला होता. तसेच अनेकांची नावे वेगवेगळ्या मतदान केंद्रावर असल्याने त्यांना वेळेवर धावपळ करावी लागली. मनपा उच्च प्राथमिक उर्दू कन्या शाळा क्र.३ मध्ये अनेक मतदारांची यादीमध्ये नाव नसल्याने मतदारांना मानसिक त्रास सहन करावा लागला. त्यांनी गोंधळ घालण्यास सुरूवात करण्यात आल्याने काही काळ तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. शेवटी पोलिसांनी हस्तक्षेप केल्याने वातावरण निवळले होते. अशीच परिस्थिती अनेक ठिकाणी दिसून आली.

## मतदानासाठी 1 पिंक बुथ, 1 दिव्यांग तर 4 आदर्श बुथ




प्रतिनिधी १५ जानेवारी

**अकोला** : महापालिका प्रशासनाने मतदानासाठी विशेष बुथची निर्मिती केली आहे. यात १ पिंक, १ दिव्यांग तर चार आदर्श बुथ आहे.

सीताबाई आर्ट कॉलेज मध्ये मतदान केंद्र क्रमांक-२४, पिंक बूथ ( गुलाबी रंग), आरडीजी महिला महाविद्यालय, मतदान केंद्र क्रमांक-०९, दिव्यांग बूथ, सुफ्फा इंग्लिश स्कूल, अकोट रोड, मतदान केंद्र क्रमांक ३१, आदर्श मतदान केंद्र, स्कूल ऑफ स्कॉलर्स, बिर्ला राम मंदिर, जठारपेठ, मतदान केंद्र क्रमांक १९ आदर्श मतदान केंद्र, राजेश्वर कॉन्व्हेंट, डाबकी रोड, मतदान केंद्र क्रमांक २४ आदर्श मतदान केंद्र आणि आदर्श विद्यालय, आदर्श कॉलनी मतदान केंद्र क्रमांक १२.- आदर्श मतदान केंद्र आहे.

## शासकीय कार्यालयाकडे 388 कोटींची थकबाकी

◆ २२ जानेवारीला होणार वीजपुरवठा बंद

प्रतिनिधी १५ जानेवारी

**यवतमाळ** : जिल्ह्यातील शासकीय व सार्वजनिक सेवा देणाऱ्या शासकीय कार्यालयाकडे तब्बल ३८८ कोटी रुपयांची थकबाकी आहे. त्यामुळे वीजबिलाच्या थकबाकीकडे सातत्याने दुर्लक्ष केल्याने अखेर महावितरणने कठोर भूमिका घेतली आहे. थकबाकी असलेल्या शासकीय कार्यालयांचा २२ जानेवारी रोजी एकाच वेळी चार तासांसाठी वीजपुरवठा खंडित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कारवाईला 'टोकन डिस्कनेक्शन' असे नाव देण्यात आले असून, हा अंतिम इशारा असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे. जिल्ह्यातील ७,८६५ शासकीय कार्यालयांकडे ३८७ कोटी ९३ लाख ४७ हजार रुपयांची थकीत वीजबिले प्रलंबित आहेत. यामध्ये प्रशासकीय कार्यालये, विविध विभागांची कार्यालये तसेच सार्वजनिक सेवा देणाऱ्या संस्थांचा समावेश आहे. वारंवार लेखी सूचना, स्मरणपत्रे, प्रत्यक्ष पाठपुरावा तसेच नोंदणीकृत मोबाईलवर संदेश पाठवूनही थकबाकी भरण्याला प्रतिसाद मिळालेला नाही. महावितरणचे मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी शासकीय कार्यालयांना तातडीने थकबाकी भरून सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

### कर्मचाऱ्यांवर वसुलीचा ताण

◆ शासकीय कार्यालयांकडील थकबाकीमुळे महावितरणच्या कर्मचाऱ्यांवर वीजबिल वसुलीचा अतिरिक्त ताण येत आहे. सामान्य ग्राहकांकडून थकबाकी राहिल्यास तत्काळ वीजपुरवठा खंडित केला जातो; मग शासकीय कार्यालयांना सवलत का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. वारंवार प्रयत्न करूनही थकबाकी वसुली होत नसल्याने कर्मचाऱ्यांनाही उत्तरदायी धरले जात असल्याची स्थिती आहे.

### तालुकानिहाय थकबाकी

◆ यवतमाळ, राळेगाव, कळंब, बाबुळगाव तालुक्यांतील १,८४८, आर्णी, दारव्हा, दिग्रस, नेर तालुक्यांतील १,७९१, घाटंजी, मारेगाव, पांढरकवढा, वणी, झरी जामणी तालुक्यांतील २,६०६, पुसद, ढाणकी, महागाव व उमरखेड तालुक्यांतील १,६२० शासकीय कार्यालयांचा थकबाकीदारांमध्ये समावेश आहे.

### थेट वीजपुरवठा बंद

◆ २२ जानेवारीला होणारी 'टोकन डिस्कनेक्शन'ची कारवाई ही पूर्वसूचना स्वरूपाची असून, यानंतरही वीजबिलाचा भरणा न केल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता संबंधित कार्यालयांचा वीजपुरवठा पूर्णतः खंडित केला जाईल, असा इशाराही महावितरणने दिला आहे. शासकीय कार्यालयांचा वीजपुरवठा बंद झाल्यास सर्वसामान्य नागरिकांना गैरसोय होईल, याची जाणीव महावितरणला आहे. मात्र, वीजबिल भरण्याबाबत सातत्याने होत असलेल्या दुर्लक्षामुळे नाईलाजास्तव कठोर पाऊल उचलावे लागत असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे.

## मतदान केंद्रांवर मोबाईल घेऊन जाणाऱ्यांची गोची !

प्रतिनिधी १५ जानेवारी



**अकोला** : आज महानगरपालिकेच्या मतदान प्रक्रियेमध्ये मतदारांना काही प्रमाणात त्रास सहन करावा लागला आहे, त्यांनी निवडणूक विभागावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. आज अकोट फाईल येथील महानगरपालिका प्राथमिक शाळा क्रमांक १८ अशोक नगर या ठिकाणी मतदार आपला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी आले असता त्यांचे कडे असलेले मोबाईल फोन ठेवावे तरी कुठे ? असा प्रश्न निर्माण झाला होता. मतदारांच्या म्हणण्यानुसार मतदान कक्षामध्ये मोबाईल नेता येत नाही तसेच मतदान कक्षा बाहेर कुठेही मोबाईल ठेवण्याकरता स्वतंत्र व्यवस्था महानगरपालिकेने केली नसल्याने नेमका मोबाईल ठेवावा तरी कुठे असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. मतदारांच्या म्हणण्यानुसार महानगरपालिकेने एक कर्मचारी या ठिकाणी नियुक्त करून त्याच्याकडे टोकन पद्धतीने मोबाईल देण्यात यावे तसेच मतदान झाल्यानंतर त्याच टोकन पद्धतीने मतदार आपला मोबाईल घेऊ शकतील असे नागरिकांचे म्हणणे होते.

मोबाईल सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था नसल्याने अनेक मोबाईल धारकांनी मतदानातून काढता पाय घेतला असल्याचे दिसून आले यापुढे निवडणूक आयोगाने मोबाईल फोन सुरक्षित ठेवण्याबाबत व्यवस्था करावी असे मत एका मतदाराने व्यक्त केले.

## शहरात दिवसा हवेने पतंगबाजांची केली निराशा, संध्याकाळी मात्र हवेने दिली साथ

प्रतिनिधी १५ जानेवारी

**अकोला:** सकाळपासूनच ढगांनी आकाशव्यापले असल्याने उत्तरेकडून वाहणाऱ्या वाऱ्यांना अटकाव झाल्यामुळे दिवसभर पतंगबाजांची निराशा झाली. पण सायंकाळी आकाशातील ढग मोकळे झाले आणि वाऱ्याने जोर धरला. त्यामुळे दिवसभर वाऱ्याच्या प्रतीक्षेत असलेल्या पतंगबाजांमध्ये सायंकाळी जोश भरला आणि आकाश रंगीबेरंगी पतंगांनी सजले. सायंकाळी सुटलेल्या वाऱ्यामुळे शहरभर पतंगबाजी रंगली. तरुणांबरोबरच कुटुंबीयांनीही पतंग उडविण्याचा आनंद लुटला.

अकोला शहरात मकरसंक्रांतीचा सण अत्यंत जल्लोषात आणि उत्साहात साजरा झाला. यंदा मकरसंक्रांतीच्या उत्सवात निवडणुका आल्याने महिलांमध्ये आठवड्याभरापासून उत्साह होता. हळदीकुंकूचे कार्यक्रम, वाणांची लूट निवडणूक प्रचारानिमित्त सर्वत्र सुरूच होती.

मकरसंक्रांतीनिमित्त पतंगबाजांनीही तयारी करून ठेवली होती, परंतु दिवसभर वाऱ्याअभावी उत्साह निवळला. मात्र, सायंकाळी हवामानात बदल होत वाऱ्याने वेग धरल्याने घरांच्या छतांवर, गॅलरीमध्ये, मोकळ्या मैदानात पतंगबाजांची गर्दी दिसून आली. जूने शहर, जठारपेठ कौलखेड़ उमरी अकोट फाइल यांसारख्या भागात पतंगबाजीचा प्रचंड वाणाच्या निमित्त महिलांच्या भेटीगाठी कौटुंबिक आणि लहान मुलांपासून वयोवृद्धांपर्यंत





◆ निवडणुकीच्या धामधूमीत सर्वत्र हळदी कुंकवाचे आयोजन

प्रत्येकजण हातात मांजाची रील घेऊन आकाशात आपली पतंग नेण्यासाठी धडपडत होते. सायंकाळी काट' आणि 'ढील दे' अशा घोषणा शहरातील गल्लोगल्ली दुमदुमून गेल्या होत्या. अनेक सोसायट्यांच्या छतावर साऊंड सिस्टीम लावण्यात आले होते, ज्यावर तरुणाईने बॉलिवूड व मराठी गाण्यांच्या तालावर ठेका धरताना पाहायला मिळाले. रात्र होईपर्यंत अकोलेकरांनी ढ़ील दे ढ़ील दे दे रे भय्या' म्हणत पतंग उडविण्याचा आनंद लुटला. रात्र झाल्यानंतर 'गोड बोला' असे म्हणत एकमेकांना शुभेच्छा दिल्या.

◆ सामाजिक एकोपा निर्माण करणारा मकरसंक्रांत हा सण, नात्यांमधील गोडवा वाढवणारा मानला जातो. नागपूरकरांनी याचे दर्शन घडवत आपल्या कुटुंबीयांसोबत छतावरच भोजनाचा आनंद घेतला. महिलांनी पारंपरिक काळ्या रंगाच्या साड्या परिधान करून हळदीकुंकू आणि वाण घेण्याच्या माध्यमातून एकमेकांच्या भेटीगाठी घेतल्या. जोर दिसून आला.

### शहरात चायनीज़ मांजा ने दोघे जखमी, तर गच्चीवरून पडल्याने युवक गंभीर जखमी

दरवर्षी मकर संक्रांतीच्या काळात पतंगबाजीच्या नावाखाली शहरात दिसणारा चायनीज मांजाचा थरार यावर्षी काहीसा शांत झाल्याचे पाहायला मिळाले. प्रशासनाने नायलॉन मांजाविरोधात राबवलेली कठोर मोहीम आणि नागरिकांमध्ये झालेली जनजागृती यामुळे अपघातांच्या संख्येत मोठी घट झाली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा जखमींचा आकडा २ ते ३ वर आल्याने शहरवासीयांनी सुटकेचा श्वास सोडला आहे. संस्कृतीचा आनंद साजरा करताना कोणाचा जीव धोक्यात येऊ नये, यासाठी यंदा प्रशासनाने कंबर कसली होती. नायलॉन मांजाची विक्री आणि वापरावर कडक निर्बंध लादल्याने शहरात दरवर्षी होणारा 'धुमाकूळ' नियंत्रणात आला. सर्वोपचार रुग्णालय प्रशासनाने अशा जखमींसाठी विशेष तयारी ठेवली होती, मात्र सुदैवाने यंदा गंभीर जखमींची संख्या अत्यल्प राहिली. यंदा अपघातांचे प्रमाण कमी झाले असले, तरीही काही ठिकाणी मांजामुळे नागरिक जखमी झाले आहेत. जुने शहरातील हमजा प्लॉट परिसरात हा साबीर पैलवान नामक व्यक्तीचा कान कापल्याने त्याला खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले तर जुने शहरातील शिवाजी नगरात शिक्षणासाठी दिग्रस येथून आलेला सार्थक पाटील नामक युवक पतंग उडवताना तोल गेल्याने दुसऱ्या मजल्यावरून खाली कोसळल्याने गंभीर रित्या जखमी झाला त्याला सुद्धा सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135


C M Y K C M Y K